**तातडीचे**

**क्रमांक : पोमसं/१६/३६९९/कवृंप-५२ वी सभा/४८/२०१६,     मुंबई, दि. ११/०३/२०२०**

**विषय :- राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषद - ५२वी सभा.**

*******

राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेची - ५२ वी सभा मंगळवार, दि.२५/०२/२०२० रोजी दुपारी १२:०० वाजता महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, मुंबई येथे घेण्यात आली. सदर सभेमध्ये ५० व्या राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या बैठकीमधील ०४ मुद्यांची आढावा, ५१ व्या राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेसाठी उपस्थित केलेले २५ मुद्दे, व ५२ व्या राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेसाठी केलेले ४५ मुद्यांवर चर्चा करण्यात आली. त्याबाबतचा कार्यवृत्तांत माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी यासोबत पाठविण्यात येत आहे. त्यामध्ये अध्यक्षांनी दिलेल्या निर्देशानुसार सर्व संबंधीतांनी आवश्यक ती कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२. घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, सदर कार्यवृत्तांत सर्व पोलीस अधिकारी / अंमलदारांच्या निदर्शनास आणण्यासाठी मुख्यालयाच्या व पोलीस ठाण्यांच्या सूचना फलकांवर लावण्यात यावा. त्याचबरोबर, ह्या सभेमध्ये घेण्यात आलेले निर्णय घटकांच्या पोलीस राजपत्रांमध्ये प्रसिध्द करावेत. तसेच, ह्या कार्यवृत्तांताच्या प्रती त्यांच्या आस्थापनेवरील सदस्यांना देवून, त्याबाबत त्यांचे काही म्हणणे **(Say/Opinions)** असल्यास, ते एक महिन्याच्या आंत या कार्यालयास कळविण्याविषयी व या मुदतीत त्यांचे म्हणणे या कार्यालयास प्राप्त झाले नाही, तर सदर कार्यवृत्तांत त्यांना मान्य असल्याचे गृहित धरले जाईल, असेही कृपया त्यांना सूचित करावे.

**(कृष्ण प्रकाश)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

**प्रति,**

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई **(सस्नेह)**
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई **(सस्नेह)**
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह)
अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग / वाहतूक / रा.रा.पो.बल / प्रशिक्षण व खास पथके/ दहशतवाद विरोधी पथक / आर्थिक गुन्हे शाखा / फोर्स वन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.

अपर पोलीस महासंचालक व संचालक, बिनतारी संदेश विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, सायबर गुन्हे / ना.ह.सं. / महिला अत्याचार प्रतिबंधक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, मो.प.वि., महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर
पोलीस उप महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे / नागपूर
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग / मोटार परिवहन विभाग / बिनतारी संदेश / विशेष कृती, नागपूर /शस्त्र निरीक्षण शाखा, पुणे सह)
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १ ते १६
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालयें.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रकटिकरण केंद्र, नाशिक.
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पो.म.सं. कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व सभासद.

**प्रत माहितीसाठी :-**

अपर पोलीस महासंचालक, का. व सु., / विशेष कृती / आस्थापना / नि. व स. / धोरण / प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, का. व सु. / आस्थापना, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक, नि. व स. / का. व सु. / प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहायक पोलीस महानिरीक्षक तथा सर संपादक (दक्षता), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस अधीक्षक, राज्य नियंत्रण कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे विधी सल्लागार, विधी अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व वरिष्ठ उप सहायक / उप सहायक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रत :-**

सर्व कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. १ ते ४४
कार्यालय अधीक्षक, प्रशिक्षण व खास पथकें / राज्य राखीव पोलीस बल / लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२/- त्यांनी कार्यवृत्तांतातील त्यांच्या कार्यासनाशी संबंधीत ज्या मुद्यांवर कार्यवाही करणे आवश्यक आहे, ती कार्यवाही संबंधीत वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मान्यतेने विनाविलंब करावी, व त्यासंबंधीचा पुर्तता अहवाल / अभिप्राय त्वरित कार्यासन क्र. १६ कडे पाठवावेत.

विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), यांचे स्वीय सहायक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**५२ वी राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेची सभा मंगळवार, दि.२५/०२/२०२० रोजी दुपारी १२:०० वाजता महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, मुंबई येथे घेण्यात आली. सदर सभेमध्ये खालील पोलीस अधिकारी व कर्मचारी / मंत्रालयीन अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते :-**

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. सु. कु. जायसवाल, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई | पद्सिध्द अध्यक्ष |
| २ | श्री. संजीव कुमार सिंघल, अपर पो.म.सं. (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई | पद्सिध्द उपाध्यक्ष |
| ३ | श्री. एस्. जगन्नाथन, अपर पो.म.सं (नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई | पद्सिध्द सदस्य |
| ४ | श्री. कृष्ण प्रकाश, वि.पो.म.नि. (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई | पद्सिध्द सचिव |
| ५ | श्रीमती एन्. अंबिका, पो. उप आ., मुख्यालय-२, बृहन्मुंबई | सभासद |
| ६ | श्री. महिपालसिंग नथ्थुसिंग चांदा, पोलीस उप अधीक्षक, गोंदिया | सभासद |
| ७ | श्री. विठ्ठल खंडुजी कुबडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पिंपरी, चिंचवड | सभासद |
| ८ | श्री. बी. डी. फुंदे, पोलीस निरीक्षक, औरंगाबाद ग्रामीण | सभासद |
| ९ | श्री. विलास आसाराम शेळके, सहायक पोलीस निरीक्षक, नाशिक शहर | सभासद |
| १० | श्री. प्रशांत देविदास गिते, सहायक पोलीस निरीक्षक, यवतमाळ | सभासद |
| ११ | श्री. एस्.एस्. डोईफोडे, पोलीस उप निरीक्षक, पो.उ.अधी., चालक प्र. केंद्र, पुणे (मो.प. विभाग) | सभासद |
| १२ | श्री. विद्याधर जयसिंग घोरपडे, पोलीस उप निरीक्षक, पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ | सभासद |
| १३ | श्री. राजेंद्र बापूराव जगताप, सहायक पोलीस उप निरीक्षक, पुणे शहर | सभासद |
| १४ | श्री. अनिल उत्तम काळे, पो. ह. क्र. १५५८, पुणे ग्रामीण | सभासद |
| १५ | श्री. वामन सखराम कोकाटे, पो. ह. क्र. १८६, नांदेड | सभासद |
| १६ | श्री. एस. एम. कनोजिया, पो. ह. क्र. २५, रारापोबल, गट क्र. ४, नागपूर | सभासद |
| १७ | श्री. एस्. के. देशमुख, पो. ह. क्र. १६४, रारापोबल, गट क्र.५, दौंड | सभासद |
| १८ | श्री. उमेश लोणारे, पो. ह. क्र. १५९, पो. प्रशि. केंद्र, नागपूर | सभासद |
| १९ | श्री. दिपक दुर्योधन राणे, पो. ह. क्र. ४३४०, कुरार पोलीस ठाणे, मुंबई | सभासद |
| २० | श्री. ताहीर हुसेन, पो. ह. क्र. १७११, नागपूर शहर | सभासद |
| २१ | श्रीमती धानुबाई बळीराम कटरे, म. पो. ह. क्र. १३१, भंडारा | सभासद |
| २२ | श्री. ए. एस्. कांबळे, पो. ना. क्र. ११३९, लोहमार्ग, पुणे | सभासद |
| २३ | श्री. गणेश काकड, पो. ना. क्र. १७७, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक | सभासद |
| २४ | श्री. तानाजी पांडुरंग पाटील, पो. शि. क्र. २६४०, ठाणे शहर | सभासद |
| २५ | श्रीमती सनिका उमेश गोडांबे, म. पो. शि. क्र. ०६-०३११, बृहन्मुंबई | सभासद |

| | |
|---|---|
| २६ | श्री. रजनीश शेठ, अपर पो.म.सं. (का. व सु.),महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| २७ | श्री. कुलवंत कुमार सारंगल, अ.पो.म.सं. (आस्थापना), महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| २८ | श्री. राजेंन्द्र सिंह, अपर पो.म.सं. (विशेष कृती), महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| २९ | श्री. जय जीत सिंह, अपर पो.म.सं. (लोहमार्ग), महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| ३० | श्री. संजय सेक्सना, अपर पो.म.सं., प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| ३१ | श्री. नवल बजाज, सह पोलीस आयुक्त, प्रशासन, बृहन्मुंबई |
| ३२ | श्री. ब्रिजेश सिंह, वि. पो.म.नि., प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| ३३ | श्री. राजेश प्रधान, विशेष पोलीस महानिरीक्षक, आस्थापना, महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| ३४ | श्री. अभिषेक त्रिमुखे, सहायक पोलीस महानिरीक्षक, नि. व स., महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| ३५ | श्री. निमीत गोयल, समादेशक, रा.रा.पो.बल, गट क्र. ८, मुंबई |
| ३६ | श्रीमती शिला साईल, सहायक पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| ३७ | श्री. लॅन्सी कोयलो, वरि.उप सहा., निवृत्ती वेतन, महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| ३८ | श्री. अरविंद जाधव, उप सहायक, पुनर्रचना, महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| ३९ | श्री. पंढरीनाथ मालडीकर, उप सहायक, लेखा, महाराष्ट्र राज्य, मुंबई. |
| ४० | श्री. दत्तात्रय सैंदाणे, उप सहायक, नि. व स., महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| ४१ | श्री. नंदकुमार खेडेकर, उप सहायक, विशेष शाखा, महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| ४२ | श्री. दिपक खेमकर, वरिष्ठ कार्यासन अधिकारी, का.क्र.१६, महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| ४३ | सर्व कार्यासन अधिकारी, पोमसं कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई |

सदर परिषदेच्या सुरुवातील मा.अध्यक्षांनी सर्व उपस्थितांना काही महत्वाच्या खालील प्रमाणे सूचना तसेच मार्गदर्शन केले.

मी पोलीस महासंचालक पदाचा कार्यभार सांभाळल्यापासून पोलीस दलासाठी बरेचशा प्रस्तावावर काम केले आहे आणि आणखी काही काम करावयाचे आहे. मागील दिवसांपूर्वी गुन्हे अर्धवार्षिक परिषद झाली. सदर परिषदेकरीता मा.मुख्यमंत्री, गृहमंत्री यांचे उपस्थितीत महत्वाच्या मुददयांचा आढावा घेण्यात आला होता. त्यात पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांचे आरोग्य तपासणी घेणेबाबत चर्चा करण्यात आली होती. त्यासाठी शासनाकडून काही अनुदान मिळणेकरीता प्रस्ताव पाठविण्यात येईल. पोलीस मुख्यालयात जे पोलीस हुतात्मे झाले आहेत त्यांची आठवण म्हणून एक गॅलरी तयार करण्याचे काम ८० ते ९०% पूर्ण झाले असुन ते काम १ मे, २०२० पर्यत पूर्ण करणार आहोत. दिनांक ०९/०२/२०२० रोजी मुंबईमध्ये प्रथमच पोलीस मॅराथॉन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सदर पोलीस मॅराथॉन आयोजनामागे जनता व पोलीसांमध्ये चांगले संबंध रहावेत / संवाद व्हावा, जनता व पोलीसांमधील दरी कमी व्हावी हा उददेश होता. महाराष्ट्र कुटुंब आरोग्य योजनेत नव्याने काही रुग्णालयांची नावे पॅनलवर समाविष्ट करण्यात आली असुन, त्याची माहिती वेबसाईटवर टाकण्यात आली आहे. पोलीस

कल्याण निधीत वाढ करणेकरीता अनेक प्रयत्न केले जात आहे. स्वस्थ पोलीस, सशक्त पोलीस, सक्षम पोलीस हा कार्यक्रम उपक्रम राबवित आहे. त्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. स्वत:चसाठी, परिवारासाठी व पोलीस विभागासाठी पोलीस शारिरीक दृष्टया तंदुरुस्त असणे आवश्यक आहे. पोलीस प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत १२० पोलीस उप अधीक्षक, ४५० पोलीस निरीक्षक  तसेच सहायक पोलीस निरीक्षक  व २५०० पोलीस अंमलदारांना वेगवेगळया ठिकाणी प्रशिक्षण देण्यात येत आहे. प्रथमच १ पोलीस उप अधीक्षक व काही अधिकाऱ्यांना बॉर्डर सेक्यूरिटी प्रशिक्षणासाठी पाठविण्यात आले होते. अकादमीतील पोलीस उप अधीक्षक यांना ईशान्य भारत ( नॉर्थ-ईस्ट ) येथे भारतीय सेनेबरोबर, ज्याप्रमाणे बॉर्डरवर लष्कर किती अटीतटीच्या वातावरणात काम करतात, त्याचे  प्रशिक्षणासाठीचा उपक्रम राबविणार असून, त्यानुसार प्रशिक्षण आयोजित करण्यात आलेले आहेत. पदोन्नतीसाठी पोलीसांना एक लहान कालावधीचे प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. नुकत्याच ठाणे येथे १० पोलीसांना हृदय रोगाचे लक्षण दिसून आले होते. पोलीसांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी त्यांची वार्षिक आरोग्य तपासणी,. तसेच पोलीसांसाठी काही स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र पोलीस कमांडोनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्यामुळे राज्य पोलीस दलाचा लौकिक वाढलेला आहे. सन २०२१ मध्ये नाशिक येथे महाराष्ट्र पोलीस क्रिडा स्पर्धा पार पडणार आहेत. त्यासाठी नाशिक येथे आंतराष्ट्रीय दर्जाचे मैदान तयार करण्यात येणार आहे. पोलीस कल्याण योजनेअंतर्गत पोलीसांसाठी पोलीस वसतीगृह बांधकाम सुरु करण्यात आले आहे. पोलीस मॅन्युअल तयार करण्यात आले असुन ते लवकरच प्रसारीत करणार आहोत.  राज्यातील राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडूना पोलीस दलामध्ये थेट भरती करण्याचे योजिले आहे. विभागीय चौकशीची प्रलंबित प्रकरणे होती, त्यातील आता बरीचशी प्रकरणे निकाली काढणेत आली आहे. महाराष्ट्रात एकुण ११५४ पोलीस ठाणे आहेत, त्यातील काही पोलीस ठाण्यात स्वच्छतागृहे बांधण्यात आली आहेत. काही पोलीसांसाठीची जी काही बाकी असलेले प्रकल्प आहेत, ते लवकरच पूर्ण करण्याचे प्रयत्न चालू आहेत. आपण सर्वांनी चांगले काम करावे, गैरप्रकारचे कामे न करुन, पोलीस दलाची प्रतिमा समाजात चांगली ठेवावी अशी अपेक्षा करतो.

५२ वी राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेत उपस्थित केलेल्या मुददयांवर मा.अध्यक्षांनी आदेश / निर्देश दिले ते यासोबत जोडलेले आहेत.

परिषदेच्या शेवटी आज उपस्थित केलेल्या मुददयांवर आम्ही विचारात घेऊन त्यावर अभ्यास करुन लवकरात लवकर कार्यवाही करु असे आश्वासन मा.अध्यक्षांनी सांगितले. त्यांनतर विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी, अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे वतीने सदरची परिषद संपल्याचे घोषित केले.

# ५० व्या कर्मचारी वृंद परिषदेच्या बैठकीमध्ये उपस्थित केलेल्या मुद्दयांवर झालेली / सुरु असलेली कार्यवाही.

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. विवेक मुगळीकर, व.पो.नि, पुणे शहर<br><br>श्री. एम. जी. सावंत, पो.उप नि., रारापोबल प्रशिक्षण केंद्र नानवीज<br><br>**का.क्र. २७-ब** | पोलीस अधि./कर्म. यांच्या पाल्यांसाठी केंद्रीय पोलीस कल्याण निधीतून अथवा प्रायोजकातर्फे निवासी होस्टेल नाममात्र भाडे आकारुन उपलब्ध करुन द्यावे. | पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई / पुणे शहर / औरंगाबाद शहर / पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी निवासी होस्टेल बांधावे.<br>ह्यासाठी अपर पोमसं, धोरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई / पुणे शहर / औरंगाबाद शहर यांचेकडून दि.२१/६/२०१९ पर्यंत प्रस्ताव प्राप्त करावे.<br>सदर प्रकरणी दि.३१ मार्च, २०२० पर्यंत केंद्रीय पोलीस कल्याण निधीतून निवासी होस्टेल नाममात्र भाडे आकारुन मुंबई / पुणे / औरंगाबाद येथे उपलब्ध करुन देण्यात यावेत. | **का.क्र. २७-ब :-** याबाबत पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई / पुणे शहर / औरंगाबाद शहर आणि पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण / औरंगाबाद ग्रामीण यांचेकडून माहिती मागविण्यात आली होती. त्यानुषंगाने त्यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत :-<br>**पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई** यांनी भूखंड उपलब्ध नसल्याने वसतीगृह बांधणे शक्य नसल्याचे कळविले आहे.<br>**पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर** आणि **पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण** यांनी वसतीगृह बांधकामाची आवश्यकता नसल्याचे कळविले आहे. **पोलीस आयुक्त, पुणे शहर** यांचे आस्थापनेवर पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे पाल्यांकरीता वसतीगृह चालू करण्यात आलेले आहे<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.** | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| २. | श्री. कमलकांत सिंह, पोलीस निरीक्षक, रा.रा.पो.बल, गट क्र.१२, हिंगोली<br><br>**अपर पोलीस महासंचालक, रा.रा.पो.बल, मुंबई** | रा. रा. पो. दलातील अधि.व कर्म. यांचे आर्थिक वर्षातील शिल्लक साप्ताहिक सुट्टीचे देयक आकारणी झाल्यास किंवा रजेला जोडून उपभोगण्यास मिळाल्यास योग्य होईल. | सदर मुद्याच्या अनुषंगाने अपर पोलीस महासंचालक, रारापोबल, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचे दि.०३/०५/२०१९ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य कार्यालयात सादर करण्यात आलेला प्रस्ताव कार्यासन क्र.३० यांनी तात्काळ शासनास प्रस्ताव पाठवून पाठपुरावा करावा. | **का. क्र. ३० :-** साप्ताहीक सुट्टीच्या देय रक्कमेची कमाल मर्यादा ८ दिवसाची आहे ती ३० दिवसांची करण्यात यावी. याबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.** | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| ३. | श्री. कमलकांत सिंह, पोलीस निरीक्षक, रा.रा.पो.बल, गट क्र.१२, हिंगोली<br><br>**का.क्र. ३०** | राज्य राखीव पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी यांना बाहेर राज्यात कर्तव्य बजावत असतांना विशेष वेतन मिळावे. | कार्यासन क्र. ३० यांनी शासनास प्रस्ताव पाठवून पाठपुरावा करावा. | **का. क्र. ३० :-** अपर पोलीस महासंचालक, रा.रा.पो.बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी शासनास उद्देशून दि. १८/०२/२०१९ रोजी या कार्यालयास सादर केलेला राज्याबाहेरील दैनिक भत्त्यामध्ये सुधारणा होण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र क्र.पोमसं/३०/रा.दै.भ.-रारापोबल क्र. ८/४४/२०१९, दि. २४/०६/२०१९ अन्वये शासनास सादर करण्यात आलेला असून, समक्रमांकित दि. ३०/१०/२०१९ व दि. ०९/१२/२०१९ रोजी शासनास स्मरणपत्र पाठविण्यात आले आहे. शासन आदेश अद्याप प्रलंबित आहेत.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.** | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| ४. | समादेशक,<br>रारापो बल, गट क्र.१५, गोंदिया<br><br>**का.क्र. २८ अ** | नैसर्गिक मृत्यू आल्यास वेतन खाते असलेल्या बँकेकडून नैसर्गिक मृत्यू संरक्षण विमा पोलीस अधि./कर्म. यांना मिळण्या बाबत करार करावा. | अपर पोलीस महासंचालक, धोरण यांनी तातडीने कार्यवाही करावी. | **कार्यासन क्र. २८-अ :-** साधारण एका माणसासाठी रुपये ७,५००/- प्रमाणे, सर्व पोलीस दलातील मध्यवर्ती स्वरुपात विमा उतरविण्याकरीता, रु. २,२०,००० X ७,५०० = रु. १६५ कोटी खर्च होईल. यासाठी आवश्यक निधी उपलब्ध नाही. तसेच या कार्यालयाच्या दि.१९.१२.२०१९ चे परिपत्रकांन्वये पोलीस अधिकारी / कर्मचा-याचा नैसर्गिक मृत्यु झाल्यास रु.५०,०००/- अनुदान देण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. याशिवाय पोलीस कल्याण निधीमधुन रु.२०,०००/- (सानुग्रह अनुदान म्हणुन) देण्यात येतात.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.** | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

# ५१ व्या कर्मचारी वृंद परिषदेच्या बैठकीमध्ये उपस्थित केलेल्या मुद्दयांवर झालेली / सुरु असलेली कार्यवाही.

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. अमोल निवृत्ती गागरे, पोशि/१२१६०, नवी मुंबई<br><br>**वि.पो.म.नि., प्रशासन उप सहा., लेखा**<br><br>**का.क्र. ३१** | **मेडीकल बिलांबाबत :-** नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील असंख्य मेडीकल बिले ही ठाणे सिव्हिल हॉस्पिटल यांचेकडून निर्णय न झाल्याने प्रलंबित आहेत तरी ठाणे सिव्हिल हॉस्पिटल यांना कर्मचारी यांची बिले मंजूर / नामंजूर करण्यासाठी १ ते ३ महिन्यापर्यतची अंतिम मुदत घालून द्यावी. तसेच नियमानुसार ठाणे सिव्हिल हॉस्पिटल यांना कोणकोणती कागदपत्रे हि बिलासोबत जोडून पाठविणे गरजेचे आहे याबाबतची यादी संबंधीतांना पाठवावी, म्हणजे त्याबाबत तपासणी करुनच व खात्री करुनच बिले पुढे सादर करता येईल तसेच आजारांचे यादीनुसार म्हणजे २७ (आकस्मिक आजार) + ५ (गंभीर आजार) याबाबतची बिले केवळ मंजुर केली जातात त्यामुळे इतर देखील सर्व आजारांची बिले मंजुर करण्यात यावीत. याबाबत सुधारणा होणेस विनती आहे. | सचिवांना पोलीस महासंचालक यांच्या सहीने पत्र देण्याबाबत निर्देश देऊन पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांना पाठपुरावा करण्याबाबत निर्देश दिले. | **का.क्र. ३१ :-**ठाणे सिव्हिल हॉस्पिटल यांना कोण कोणती कागदपत्रे ही बिलासोबत जोडून पाठविण्या बाबतची तपासणीसूची संचालनालय आरोग्य भवन, रुग्णालये-राज्यस्तर, मुंबई यांचेकडून दि. २३/१२/२०१९ रोजी प्राप्त करुन, दि. २४/१२/२०१९ रोजी पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांना पाठविण्यात आली.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढावा.** | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| २. | श्री. अमोल निवृत्ती गागरे, पोशि/१२१६०, नवी मुंबई<br><br>**वि.पो.म.नि., प्रशासन उप सहा., लेखा**<br><br>**का.क्र. ३१** | **मा. पोलीस महासंचालक सो यांचे गृहकर्जाबाबत :-** DG लोनसाठी रक्कमेच्या मर्यादा घालेल्या असल्याने तसेच X,Y,Z असे शहारांचे वर्गीकरण केलेले असल्याने त्यानुसार पनवेल, खारघर, कामोठे इत्यादी ठिकाणी घरांच्या किंमती या ३५ ते ४० लाखांच्या पुढे आहेत व अशा ठिकाणी DG लोन हे २० लाखांच्या आत मिळत आहे. तसेच वित्त विभाग शासन निर्णय शासन परिपत्रक क्रमांक घबांअ/ २०१२/प्र.क्र.३०/२०१२/विनियम, दि.२४/०४/२०१९ अन्वये ६ व्या वेतन आयोगानुसारच DG लोन मंजूर करावे असे नमुद केले आहे यामध्ये सुधारणा होऊन वाढीव पगारानुसार DG लोन मंजूर व्हावे. तरी, सदरची वरील सर्व प्रक्रिया कर्मचाऱ्यांचे दृष्टीने अन्यायकारक आहे. तरी पुर्वीची प्रक्रिया पुन्हा सुरु करण्यात यावी हि विनंती. | शासनास प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले. | **का.क्र. ३१ :-** राज्यातील पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना ७ वा वेतन आयोगाप्रमाणे घरबांधणी अग्रिम मंजूर होण्याबाबत पत्र क्र.पोमसं/३१/ घबांअ/क.वृं.प./३०७/२०१५, दि. २५/१०/२०१९ अन्वये शासनास विनंती केली आहे. परंतू, अद्यापपर्यंत शासनाकडून आदेश अप्राप्त आहे.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.** | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| ३. | श्री. आर.बी. जगताप, सहा.पो.उप निरी. पुणे शहर<br><br>**वि.पो.म.नि., आस्था उ.स.,आस्था.-२**<br><br>**का.क्र. ५** | पोलीस उप निरीक्षक पदासाठी पदोन्नतीची अर्हता परिक्षा सन २०१३ मध्ये घेण्यात आलेली आहे. त्यामधील पात्र उमेदवारांची यादी सेवाज्येष्ठतेनुसार व नियमावली प्रमाणे प्रसिध्द करुन पात्र कर्मचाऱ्यांना लवकरात लवकर पदोन्नती देण्यात यावी. | त्वरीत कार्यवाही पुर्ण करण्याबाबत निर्देश दिले. | **का. क्र. ५ :-** पोलीस उप निरीक्षक भरती नियम १९९५ मधील नियमामध्ये सुधारणा होणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे. सदर प्रस्तावास शासन मान्यता अद्याप प्राप्त झालेली नाही. शासन मान्यता प्राप्त होताच सदर प्रकरणी पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| ४. | श्री. पी.पी. खडपकर, पोलीस उप निरीक्षक, गट क्र.१, पुणे<br><br>**वि.पो.म.नि., आस्था व.उ.स.,आस्था. -१**<br><br>**का.क्र. ३** | महाराष्ट्र पोलीस दलाचे राज्य राखीव पोलीस बल हे अविभाज्य दल असून सदरचे दल हे वर्षातील ८ ते १० महिने विशेष बंदोबस्ताकरीता घराबाहेर असते, त्यामुळे कौटुंबिक अडचणी, मुलांचे शिक्षण, कुटूंबातील आजारी व्यक्ती यांची सुश्रुषा करणेकरीता जवानांना रजा अपुरी असल्याने सिक पर्याय निवडावा लागतो, तरी प्रतिमहा दीड दिवस प्रमाणे १८ दिवस नैमित्तीक रजा मिळावी. | प्रस्ताव शासनाकडे पाठवून पाठपुरावा करण्याबाबत निर्देश दिले. तसेच अपर पोमसं, रारापोबल, मुंबई यांना चर्चा करण्याबाबत निर्देश दिले. | **का.क्र. ३ :-** अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी शासनास उद्देशून दि. ०३/०५/२०१९ रोजी या कार्यालयास सादर केलेला साप्ताहिक सुट्टीच्या मोबदल्यात दैनिक भत्त्याच्या दरात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाचे भत्त्याच्या दरात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र क्र.पोमसं/३०/सा.सु.मोबदला/अपोमसं रारापो बल, मुंबई/७९/२०१९, दि. २४/०६/२०१९ अन्वये शासनास सादर करण्यात आलेला असून, समक्रमांकित दि. ३०/१०/२०१९ व दि. ०९/१२/२०१९ रोजी शासनास स्मरणपत्रे पाठविण्यात आले आहे. शासन आदेश अद्याप प्रलंबित आहेत. | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| ५. | श्री. महिपाल सिंह चांदा,<br>पोलीस उप अधीक्षक,<br>आर्थिक गुन्हे शाखा,<br>गोंदिया<br><br>**वि.पो.म.नि., प्रशासन**<br>**उप सहा., लेखा**<br><br>**का.क्र. ३०** | तपासकामी, चौकशीकामी, समन्स वॉरंट तामीली तसेच पेट्रोलिंग या सारख्या कर्तव्यावर जाण्याकामी अधिकारी / कर्मचारी हे आपल्या खाजगी दुचाकी व चारचाकी वाहनाचा वापर करतात. त्यांना इंधन खर्च दैनिक भत्त्यात कि.मी. प्रमाणे मिळावे. | इंधन खर्च दैनिक भत्त्यात कि.मी. प्रमाणे देता येते की नाही याबाबत नियम बघून कार्यवाही करावी. | **का क्र. ३० :-** शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-प्रवास-१०१०/प्र.क्र.२/सेवा-५, दि. ३/३/ २०१० मधील परि. क्र. ५ नुसार इंधन खर्च दैनिक भत्त्यात कि.मी. प्रमाणे देय आहे.<br>या कार्यासनाचे पत्र क्र.पोमसं/३०/ कर्मचारी वृंद परिषद/५० वी सभा/ २३०/ २०१८, दि. २०/०७/२०१९ अन्वये संबंधित अधिकारी यांना पोलीस अधीक्षक, गोंदिया यांचे मार्फत आवश्यक ती माहिती देण्यात आली आहे.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.** | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| ६. | श्री. व्हि. के. कुबडे,<br>वरिष्ठ पोलीस निरीक्षक,<br>पिंपरी-चिंचवड,<br>**वि.पो.म.नि., प्रशासन**<br><br>**उ.स., वि. चौ.**<br><br>**का. क्र. ११** | पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेमध्ये वादातून अर्ज केले जातात. सदरचे अर्ज नियमाप्रमाणे वरिष्ठांचे नावाने करुन त्यांचेकडे पोचविणे संबंधीत तक्रारदार पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची जबाबदारी आहे. परंतु संबंधीत पोलीस अधिकारी व कर्मचारी हे वरिष्ठांना अर्ज न देता परस्पर प्रसार माध्यमांना देऊन ते संबंधीत अधिकारी व कर्मचाऱ्यांची बदनामी करुन पोलीस दलाची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न करतात. जे पोलीस अधिकारी व कर्मचारी हे वरिष्ठांकडे अर्ज न करता परस्पर प्रसार माध्यमांना अशा प्रकारचे अर्ज करतील, तसेच सदरचे अर्जामध्ये चौकशीअंती काही निष्पन्न न झाल्यास संबंधीत तक्रारदार पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द कडक शिस्तभंगात्मक कार्यवाही होणे गरजेचे आहे. | सदर मुद्याच्या अनुषंगाने प्रस्तुत नियमांत वृत्तपत्रे, आकाशवाणी, दुरदर्शन तसेच सामाजिक प्रसार माध्यमांशी संपर्क ठेवण्यास प्रतिबंध करण्याबाबतचे परिपत्रक काढावे, व mahapolice या वेबसाईटवर प्रसारीत करावेत. | **का. क्र. ११ :-** मा. अध्यक्ष महोदयांनी दिलेल्या निर्देशाची पुर्तता पालन केली असून, या कार्यालयाकडून क्र.पोमसं/११ /२२/६/८७/२०१९, दि. १४/१०/२०१९ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम ३ व ९ (३)(ड) या नियमातील तरतुदीनुसार योग्य ती कार्यवाही करण्यासंबंधी सर्व घटक कार्यालयांना परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे, सदरचे परिपत्रक पोलीस महासंचालक कार्यालयाचे संकेतस्थळ www.mahapolice.gov.in वर Flash या सदरामधील Other Flash मध्ये एक महिन्याकरिता प्रसिध्द करण्यात आले आहे.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.** | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| ७. | श्री. गणेश काकड, पोलीस शिपाई, नेम. महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक<br><br>**वि.पो.म.नि., आस्था व.उ.स.,आस्था.-१**<br><br>**का.क्र. ३-अ** | राखीव पोलीस उप निरीक्षक हे पद परीक्षा पास झाल्यानंतर बिंदू नामावलीप्रमाणे न भरता सदरचे पद गुणवत्ता यादीप्रमाणे (Merit List) व रिक्त पदानुसार भरण्यात यावे. तसेच राखीव पोलीस उप निरीक्षक पदाची परीक्षा देण्यासाठी पात्रता १२ वी पास, जिल्हा कवायत निदेशक (DDI) प्रशिक्षण पुर्ण केलेले असावे. सदर परीक्षेकरीता सध्या पोलीस हवालदार पदावर चार वर्षे सेवेची अट आहे. परंतु पोलीस प्रशिक्षण केंद्र येथे एक टप्पा पदोन्नती (One Step) रद्द झाल्याने, जिल्हा पोलीस दलात पोलीस हवालदार होण्यास साधारणत: २४ वर्ष सेवा पुर्ण असावी लागते व त्यामुळे तरुण कर्मचारी राखीव पोलीस उप निरीक्षक होण्यापासून वंचित रहातात. तरी सदरची अट शिथील करुन १२ वर्ष सेवा पुर्ण त्यामध्ये ३ वर्ष पोलीस प्रशिक्षण केंद्र येथे सहायक कवायत निदेशक म्हणून काम केलेले असावे. अशी सुधारीत अट असावी जेणेकरुन नवीन जोमाचे, शारिरीक व मानसिक दृष्ट्या सक्षम अधिकारी खात्याला मिळतील. | अपर पोमसं, रारापोबल, मुंबई यांना पॅरा मिलीटरी फोर्सेस नियम काय आहेत ते तपासावे. तसेच गुजरात / कर्नाटक / मध्य प्रदेशमध्ये SRPF साठी काय नियम आहेत. ते पाहून कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले. | **का.क्र. ३-अ :-** अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र.अपोमसं/रारापोबल/५१ क.वृं.प. /२४/२०१९/८२, दि. ०६/०१/२०२० अन्वये असे कळविले आहे की, पोलीस महासंचालक, मध्यप्रदेश, कर्नाटक व गुजरात यांचेकडून माहिती मागविण्यात आली असून, माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. सदरची माहिती प्राप्त होताच या कार्यालयास कळविण्यात येईल. तथापि, संकेतस्थळावर उपलब्ध झालेल्या माहितीनुसार व तुलनात्मक तक्ता तयार करुन, अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी पाठविला आहे. | याप्रकरणी कार्यासन अधिकारी यांनी अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाकडून माहिती घेऊन, आवश्यक ती कार्यवाही करावी. |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| ८. | श्री. गणेश काकड, पोलीस शिपाई, नेम. महाराष्ट्र पोलीस अकॅडामी, नाशिक<br><br>**अ.पो.म.सं., नि. व स.**<br>**स.पो.म.नि., नि. व स.**<br><br>**का. क्र. १८** | महाराष्ट्रातील सर्व प्रशिक्षण केंद्र येथील कवायत निदेशक (DI) यांचेकरीता प्रथम श्रेणी गणवेश व शुज, पी.टी. गणवेश व शुज तसेच जंगल कॅम्प गणवेश (कंमाडो डांगरी) व शुज एकसारखा असावा. त्यासाठी शासनाने कपडा व शुज एकत्र खरेदी करावे म्हणजे रंगामध्ये तफावत असणार नाही. | याबाबत अपर पोमसं, का.व सु. यांचे अध्यक्षतेखाली अपर पोमसं, लोहमार्ग / नि.व स. / रारापोबल / प्रशिक्षण व खास पथके यांची समिती करावी व या संदर्भातील अहवाल एका आठवड्यात सादर करण्या बाबत निर्देश दिले. | **का. क्र. १८ :-** दि. १७/०६/२०१९ रोजी अपर पोलीस महासंचालक (नि.वस.) यांचे दालनात वरिष्ठ अधिकारी यांनी सर्व कापडयाचे नमूने पाहून, सदर सर्व कापडांच्या शेडची पाहणी केली असता, मे. मफतलाल यांचेकडील शेड क्र. BB २३० २३० या शेडची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. त्यानुसार मे. मफतलाल यांचेकडून विनिर्देश व PANTONE १८-१०२२ TCX CODE नुसार कापडाचा नमूना प्राप्त झाला असून, सदर कापडाचा नमुना सबसिडीअरी कॅन्टीनमध्ये ठेवण्यासाठी दिनांक २७/१२/२०१९ च्या परिपत्रकासोबत सर्व घटकांना पाठविण्यात आला आहे व त्याप्रमाणे आवश्यकती कार्यवाही करण्याबाबत संबंधीतांना सूचना देण्यात आल्या आहेत.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.** | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| ९. | श्री. अनिल उत्तम काळे, पो.ह.क्र. १५५८, पुणे ग्रामीण<br><br>**अ.पो.म.सं., नि. व स.**<br>**उ.स., पुनर्रचना**<br><br>**का.क्र. २७-ब** | पोलीस स्टेशनमध्ये महिला पोलीस कर्मचाऱ्यांना विश्रांती करीता स्वतंत्र रुमची आवश्यक आहे. ज्या प्रकारे शिक्षकांना स्टाफ रुम असतो त्याप्रमाणे तो विश्रांती रुम असावा. | किती पोलीस ठाण्यांमध्ये विश्रांती रुम झाले आहेत. याबाबतची माहिती mahapolice या वेबसाईटवर प्रसारित करावी. | **का.क्र. २७ -ब :-** महाराष्ट्र राज्यात एकूण ११५४ पोलीस ठाणी असून, महिला पोलीस अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी एकूण ५७१ स्वतंत्र विश्रांतीगृह व ८३७ स्वतंत्र स्वच्छतागृह बांधण्यात आली असून, त्याची यांदी या कार्यासनाच्या दि. १९/१२/२०१९ च्या ज्ञापान्वये www.mahapolice.gov.in या वेबसाईटवरील Other Flash या टॅबवर प्रसारित करण्यात आली आहे.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.** | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन</th><th>उपस्थित केलेले मुद्दे.</th><th>मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश</th><th>कार्यासनाचे अभिप्राय</th><th>मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश</th></tr>
<tr><td>१०.</td><td>श्री. अनिल उत्तम काळे, पो.ह.क्र. १५५८, पुणे ग्रामीण<br><br>वि.पो.म.नि., प्रशासन उ.स., र. व का.<br><br>का. क्र. ८ अ</td><td>घटकातील काही पोलीस स्टेशनला कायमस्वरुपी / अंशकालीन सफाई कर्मचारी यांची नेमणूक करणेत आलेली आहे. परंतु काही पोलीस स्टेशनमध्ये सफाई कर्मचारी यांची नेमणूक नसल्याने याठिकाणी टॉयलेट / बाथरुमची स्वच्छता होत नाही. अशा पोलीस ठाणेमध्ये कायमस्वरुपी अंशकालीन सफाई कामगारांच्या नेमणुका होणे आवश्यक आहे.</td><td>किती घटकातील पोलीस स्टेशनला अंशकालीन सफाई कर्मचारी नाहीत. त्याची माहिती काढावी. तसेच ज्या ठिकाणी सफाई कर्मचारी नाही त्याठिकाणी सफाई कर्मचारी नेमण्यासाठी घटक प्रमुख यांना योग्य निर्देश द्यावे.</td><td><u>का.क्र. ८-अ</u> :- १. अंशकालीन सफाई कामगारांची नियुक्ती करण्याचे प्राधिकार शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पीसीआर-१४७९/सीआर/१०९९/एसईआर-१०, दि. ०६/०२/१९८० अन्वये घटक प्रमुखांना आहेत.<br>२. महाराष्ट्र राज्यात एकूण पोलीस स्टेशनची संख्या ११७० इतकी असून, तेथे सर्व ठिकाणी घटक प्रमुखांनी अंशकालीन सफाईगारांची (कंत्राटी पध्दतीने ११ महिन्याकरिता ) नियुक्ती केलली आहे.<br>३. पुणे ग्रामीण येथे पोलीस स्टेशनची संख्या ३५ असून, त्यामधील १२ पोलीस स्टेशन अंशकालीन सफाईगारांची नेमणूक करण्यात आली नव्हती. आता ती करण्यात आली आहे.<br>सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.</td><td>अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.</td></tr>
<tr><td>११.</td><td>श्री. अनिल उत्तम काळे, पो.ह.क्र. १५५८, पुणे ग्रामीण<br><br>अ.पो.म.सं., नि. व स. उ.स., पुनर्रचना<br><br>का.क्र. २७-ब</td><td>नवीन पोलीस स्टेशनला अधिकारी, कर्मचारी निवासस्थाने नाहीत. सदरची निवासस्थाने झाली तर कर्मचाऱ्यांचा जाण्या-येण्याचा वेळ वाचेल व पोलीस कर्मचारी हे कामाच्या ठिकाणी लवकर हजर राहून आपले कर्तव्य तत्परतेने बजावतील</td><td>कोणकोणत्या जिल्ह्यामध्ये बांधकामे सुरु आहेत. अपर पोलीस महासंचालक (नि.व स.) यांनी माहिती मागवून सदरची माहिती mahapolice या वेबसाईटवर प्रसारित करण्या बाबत निर्देश दिले. २ ते ३ वर्षामध्ये विविध प्रकल्प पुर्ण करण्यात यावेत.</td><td><u>का.क्र. २७-ब</u> :- महाराष्ट्र राज्यात कोणकोणत्या जिल्हयामध्ये बांधकामे सुरु आहेत याबाबतची विस्तृत माहिती या कार्यासनाच्या दि.२०/११/२०१९ च्या ज्ञापान्वये www.mahapolice.gov.in या वेबसाईट वरील Other Flash या टॅबवर प्रसारित करण्यात आली असून, त्याची थाडक्यात माहिती खालीलप्रमाणे आहे :-<br>
<table>
<tr><th>तपशील</th><th>निवासस्थानांची संख्या</th></tr>
<tr><td>बांधून हस्तांतरीत करण्यात आलेले</td><td>२०९२</td></tr>
<tr><td>प्रगतीपथावर असलेले</td><td>७,६७६</td></tr>
<tr><td>निविदा स्तरावरील</td><td>१,७६८</td></tr>
<tr><td>प्रशासकीय मान्यता प्राप्त परंतू, प्राधान्यक्रमावर नसलेले</td><td>४,३२९</td></tr>
<tr><td>निधी अभावी स्थगित ठेवण्यात आलेले</td><td>१६,७४२</td></tr>
<tr><td>एकूण</td><td>३२,६०७</td></tr>
</table>
सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.</td><td>अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.</td></tr>
</table>

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| १२. | श्री. ताहिर हुसैन, पो.ह.क्र.१७११, नागपूर शहर<br><br>**वि.पो.म.नि., आस्था व.उ.स.,आस्था.-१**<br><br>**का.क्र. ३ (नोडल डेस्क)** | पोलीस अधिकारी व कर्मचारी हे कर्तव्यावर हजर असतांना (सी.आर.मोबाईल, पीटर मोबाईल चार्ली मोबाईल, नाईट गस्त, नाकाबंदी वगैरे) त्यांचा काही वेळा अपघात झाल्यावर किंवा कायदा व सुव्यवस्थेचे वेळी जखमी झाल्यावर त्यांना उपचाराकरीता हॉस्पिटलमध्ये लागते व त्यांना बेडरेस्ट दिला जातो. त्यांचा बेडरेस्टचा कालावधी मेडीकल रजेमध्ये समाविष्ट होतो. असे न होता त्यांचा उपचाराचा कालावधी **I.O.D. (इंज्युरी ऑन ड्युटी)** मध्ये गणना करण्यात यावा. | १ वर्षापासून इंज्युरी ऑन ड्युटी अशी किती प्रकरणे आहेत. याबाबतची माहिती घेऊन या संदर्भात विपोमनि, आस्थापना यांनी कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. | **का.क्र. ३ :-** अपघात झाल्यावर किंवा कायदा व सुव्यवस्थेचे वेळी जखमी झाल्यावर पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना उपचाराकरीता हॉस्पिटल मध्ये जावे लागते व त्यांना बेडरेस्ट दिला जातो. त्यांचा बेडरेस्टचा कालावधी मेडीकल रजेमध्ये समाविष्ट न होता सदर बेडरेस्टचा कालावधी हा इंज्युरी ऑन ड्युटी मध्ये गणण्याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मध्येकोणतीही तरतूद नाही.<br>तरी उपरोक्त मुद्याच्या अनुषंगाने एकूण २७ घटकांचे अहवाल प्राप्त झाले असून त्यापैकी एकूण १५ घटकांचा अहवाल हा निरंक असून उर्वरीत १२ घटकांत इंज्युरी ऑन ड्युटी अशी एकूण ११६ प्रकरणे आहेत. त्यापैकी एक वर्षाच्या आतील ११२ प्रकरणे आहेत.<br>घटकप्रमुखांनी पोलीस अधिकारी व कर्मचारी हे कर्तव्यावर हजर असतांना म्हणजेच प्रत्यक्ष कर्तव्य बजावत असताना ज्यांना दुखापत / इजा झाली आहे, अशीच प्रकरणे सादर करणे अपेक्षित आहे परंतु घटक प्रमुखांनी पोलीस अधिकारी व कर्मचारी हे कर्तव्यावर येत असताना / कर्तव्यावरुन परत जातानाची प्रकरणे देखील सदर अहवालात सादर केलेली आहेत.<br>प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मध्ये नियम ७५ व नियम ७६ या दोन्ही नियमांतील तरतुदीं तसेच शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अरजा-२४९७/०७/सेवा-९, दि.०९/०५/२००० अन्वये निकष ठरविले आहेत. त्यानुसार सुधारीत अहवाल सादर करण्याबाबत सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात आले आहे.<br>तरी सदर बाबत नियम करण्याचा पुर्ण अधिकार शासनास असल्याने सर्व घटकांची माहिती प्राप्त झाल्यानंतर त्यांची तपासणी करुन नियमांत तरतूद असलेली प्रकरणे विचारात घेवून त्याबाबत निर्णय/मार्गदर्शन घेण्याबाबत शासनास सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात येईल. | प्रस्तुत प्रकरणी कार्यासन अधिकारी यांनी प्रस्ताव शासनाला पाठवावा. |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| १३. | श्री. ताहिर हुसैन, पोहवा/१७११, नागपूर शहर<br><br>अपर पोमसं, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई | पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयांकडून विविध प्रशिक्षणाकरीता विविध पशिक्षणास्थळी पाठविण्यात येते. प्रशिक्षणास पाठविण्यापूर्वी त्यांना काही रक्कम मेस अग्रीम म्हणून अदा करणेबाबत कळविण्यात येते. परंतु सदरचा अग्रीम हा प्रशिक्षण फंडातून देण्यात यावा. याबाबत स्पष्ट सूचना देण्यात येत नाही. प्रशिक्षणाकरीता निवड करण्यात आलेले अधिकारी व कर्माचारी हे प्रशिक्षणास जाण्या अगोदर कार्यालयामार्फत त्यांचा प्रशिक्षण कालावधी तसेच प्रशिक्षण देण्यात येत असलेल्या शहरांच्या दैनिक भत्त्याची रक्कम लक्षात घेऊन संबंधीतांना नियमानुसार ७५% प्रवास भत्ता अग्रीमाची रक्कम मेस अग्रीमाचे स्वरुपात अदा करण्यात येते.<br>पोलीस अधिकारी व कर्मचारी हे प्रशिक्षणास्थळी हजर झाल्यानंतर त्यांना मेस अग्रीम व निवास शुल्क, भोजनालय व्यवस्थापन, विकास निधी, विद्युत निधी, फोटो इत्यादी रक्कम भरावी लागते. त्यांची एकूण रक्कम ही त्यांचे प्रशिक्षण कालावधीची प्रवास भत्ता देयकाचे रक्कमेपेक्षा जास्त होते. प्रवास भत्ता देयकातील अदा करण्यात आलेल्या आगावू अग्रीमाची रक्कम कपात करुन त्यांना उर्वरित रक्कम ही प्रवास भत्ता म्हणून अदा करण्यात येते. पंरतु सदरची रक्कम ही कमी असल्यामुळे त्यांचा मेस अग्रीम व इतर खर्च मंजूर करणे शक्य होत नाही. या कारणाने प्रशिक्षणार्थींचे आर्थिक नुकसान होत असते. त्यामुळे प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणास जाण्यास इच्छुक होत नाही.<br>तरी, मेस अग्रीम व निवास शुल्क, भोजनालय व्यवस्थापन, विकास निधी, विद्युत निधी, फोटो इत्यादी रक्कम असा एकूण खर्च यांचा समावेश हा प्रशिक्षण खर्चात केल्यास कोषागार कार्यालय सुध्दा देयकात आक्षेप घेणार नाही व संपूर्ण खर्च झालेली रक्कम प्रशिक्षणार्थी यांना मिळेल व ते अधिकारी व कर्मचारी प्रशिक्षणास जाण्यास इच्छुक होतील. | सदरबाबत सर्व घटक प्रमुखांना २ दिवसात सूचना देण्या बाबत निर्देश देऊन mahapolice या वेबसाईटवर प्रसारीत करावे, व सर्व सभासदांना प्रशिक्षणाबाबतचे परिपत्रक देण्यात यावा. तसेच प्रशिक्षणासाठी जे अनुदान येते ते प्रशिक्षण केंद्रांना देण्याबाबत निर्देश दिले. | **अपर पोमसं, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई :-**<br>प्रस्तुत प्रकरणी अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाचे क्र.प्रशि/ लेखा-१/प्रशिक्षण- प्रवास व दैनिक भत्ता/२०१९/१३, दि. २०/०६/२०१९ च्या परिपत्रकान्वये राज्यातील सर्व पोलीस घटक प्रमुखांना सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| १४. | श्रीमती सानिका उन्मेश गोंडाबे, म.पो.शि.क्र.०६-०३११, बृहन्मुंबई<br><br>**वि.पो.म.नि., प्रशासन व.उ.स., नि. वे. का. क्र.२८.** | **महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनेच्या कार्यपध्दतीमध्ये बदल होणेबाबत :-** महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनेच्या कार्यपध्दतीमध्ये बदल करण्यात यावा. तातडीची बाब म्हणून पोलीस अधिकारी / अंमलदार यांना पॅनलवरील हॉस्पीटल तसेच इतर हॉस्पीटलमध्ये दाखल होण्यासाठी डेबिटकार्ड सारखे कार्ड देण्यात यावे. जेणेकरुन पोलीस अधिकारी / अंमलदार यांना हॉस्पीटलमध्ये दाखल होण्यासाठी त्रास होणार नाही. पोलीस अधिकारी / अंमलदार यांना हॉस्पीटलमध्ये दाखल होतांना ते ज्या ठिकाणी कार्यरत आहेत. त्या कार्यालयाच्या वरिष्ठांच्या सही शिक्याचे पत्र आणावे लागते. पोलीस अधिकारी / अंमलदार स्वत: रुग्ण असतील, तर त्यांच्या नातेवाईकांची धावपळ होते. तसेच मेडीकल असिस्टन्स् यांची त्वरीत मान्यता मिळाली नाही. तर पोलीस अधिकारी / अंमलदार यांना नाहक अनामत रक्कम भरावी लागते व सदरची रक्कम परत मिळण्याकरीता खुप कालावधी लागतो. | सदर मुद्यांच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. | **का. क्र. २८ :-** MPKY योजनेमध्ये वैद्यकीय सुविधा मोफत आहेत. अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे डेबीट कार्ड सारखी ओळखपत्रे देणे संयुक्तिक होणार नाही.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.** | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| १५. | श्रीमती सानिका उन्मेश गोंडाबे, म.पो.शि.क्र.०६-०३११, बृहन्मुंबई<br><br>**वि.पो.म.नि., प्रशासन उप सहा., लेखा का.क्र. ३०** | **७ व्या वेतन आयोगानुसार पोलीस नाईक पदास विशेष वेतन मंजूर होणेबाबत :-** दि.१/१/२०१९ रोजीच्या वित्त विभागाच्या शासन निर्णयासोबत जोडलेल्या प्रपत्रामधील मुद्दा क्र.८ नुसार "पोलीस शिपाई, पोलीस नाईक आणि हवालदार या संवर्गाशी निगडीत कर्तव्याचे स्वरुप विचारात घेऊन त्या संवर्गाचे विद्यमान रु.५००/- दराने मिळत असलेले विशेष वेतन पुढे चालू ठेवण्यात आले होते. सदर विशेष वेतनात ५० टक्के वाढ करुन ते यापुढे देखील सुरु ठेवण्याची समितीने शिफारस केली आहे." व शसनाने शिफारस स्विकृत केली आहे. | पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचेकडून शासनास पाठविण्यात आलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा करण्यात यावा. व पोलीस महासंचालक कार्यालयाकडून प्रस्ताव पाठविण्यात यावा. | **का . क्र. ३० :-** ७ व्या वेतन आयोगानुसार पोलीस नाईक पदास विशेष वेतन मंजूर होणेबाबतछ चा प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं/३०/क.वृ.प.५०वी सभा/२३०/२०१८, दि.१०/७/२०१९ अन्वये शासनास सादर करण्यात आलेला असून, समक्रमांकित दि. ३०/१०/२०१९ व दि.९/१२/२०१९ रोजी शासनास स्मरणपत्र पाठविण्यात आले आहे. तथापि, शासन आदेश अद्याप प्रलंबित आहेत. प्रस्तुत प्रकरणी गृह विभागातील पोल-५(ब) मध्ये अपर मुख्य सचिवांना नस्ती सादर केल्याचे सांगण्यात आले. लवकरच निर्णय होण्याची शक्यता आहे.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा** | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे. |
| १६. | पोलीस उप आयुक्त, दहशतवाद विरोधी पथक, मुंबई<br><br>**वि.पो.म.नि.,प्रशासन उप सहा., लेखा का.क्र. ३०** | दहशतवाद विरोधी पथकातील अधिकारी व अंमलदारांकरीता लागू असलेल्या उत्तेजनार्थ योजनेनुसार सातव्या वेतन आयोगाप्रमाणे मुळ वेतन + महागाई भत्त्याच्या ५०% जादा वेतन मिळणेबाबतच्या सदर प्रस्तावानुसार पोलीस महासंचालक कार्यालयाकडून शासनाकडे पाठपुरावा करण्यात यावा. | सदर प्रकरणी शासनाकडे प्रस्ताव पाठवावा. व या प्रकरणी मा. अध्यक्षांना पुर्ण माहिती द्यावी. | **का. क्र. ३० :-** या कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं/३०/द.वि.प./ उत्तेजनार्थ योजना/१८३/२०१८, दि. २९/११/२०१८ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्या अनुषंगाने शासनाने दि. ०६/०९/२०१९ च्या पत्रान्वये ७ व्या वेतन आयोगानुसार मिळणारे मुळ वेतन x ०.२५ = सातव्या वेतन आयोगामधील प्रोत्साहन भत्ता या सूत्रानुसार परिगणना करण्याबाबत कळविले आहे.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.** | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे. |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| १७. | पोलीस आयुक्त, अमरावती शहर<br><br>**वि.पो.म.नि., प्रशासन व.उ.स., नि. वे. का. क्र.२८.** | कुंटूंब आरोग्य योजनेअंतर्गत पॅनलवर अमरावती आयुक्तालयाचे आस्थापनेवर बालरोगतज्ञ यांचे रुग्णालय नाही, तरी त्याबाबत विचार करण्यात यावा. | दि.१८/६/२०१९ रोजी महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनेच्या पॅनलवर नव्याने रुग्णालये घेण्याकरीता समितीची बैठक आयोजित करण्याचे आदेश दिले. | **का. क्र. २८ :-** अमरावती शहरात एकुण ६ हॉस्पीटल पॅनलवर आहेत. त्यांची नावे खालीलप्रमाणे :<br>१. Amravati Cancer Foundation's Cancer Hospital & Research Institute<br>२. Dayasagar Hospital, Amravati<br>३. Hi-Tech Multispeciality Hospital & Research Centre<br>४. Parashree Hospital<br>५. Mahaveer Hospital & medical Research Center<br>६. Zenith Hospital<br>महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेच्या पॅनलवर येण्यास इच्छुक असलेले पारिजात हॉस्पीटल (बालरोग तज्ञ), अमरावती विहित निकष (Criteria) पुर्ण करित नसल्याने त्यांना महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेच्या पॅनलवर घेता आले नाही.<br>**त्यामुळे सदर मुद्या निकाली काढण्यात यावा.** | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| १८. | **पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण**<br><br>**वि.पो.म.नि., आस्था उ.स.,आस्था.-२ का.क्र. ५** | पोलीस दलामध्ये पोलीस शिपाई या पदावर पोलीस कर्मचारी भरती झाल्यानंतर इतर खात्याप्रमाणे तो कमीत कमी वर्ग-२ अधिकारी म्हणून सेवानिवृत्त व्हावा त्याकरीता एम.पी.एस.सी. मार्फत डायरेक्ट पोलीस उप निरीक्षक पदाची निवड न करता खत्याअंतर्गत परीक्षा मार्फत कर्मचारी निवडण्यात यावा जेणेकरुन पोलीस खात्याला त्याचा मागील सेवेचा अनुभव कामी येईल व शासनाचा इतर खर्च वाचेल. | अपर पोमसं, का. व सु., / लोहमार्ग / रारापोबल / प्रशिक्षण व खास पथके, विपोमनि, आस्थापना / सह पोलीस आयुक्त, प्रशासन, बृहन्मुंबई यांची कमिटी तयार करावी. व कमिटीने १५ दिवसात अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. | **का.क्र. ५ :-** सदर कमिटीने अभ्यास करुन, पोलीस उप निरीक्षक (सेवाप्रवेश) नियम १९९५ मध्ये सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाला दि. ११/०९/२०१९ रोजी सादर केला आहे.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.** | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| १९. | **मुद्दा क्र.३४**<br><br>पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण<br><br>**वि.पो.म.नि., प्रशासन उप सहा., लेखा का.क्र. ३०** | ७ व्या वेतन आयोगामध्ये पोलीस निरीक्षक यांचे वेतन तहसिलदार, सहायक पोलीस निरीक्षक यांचे वेतन नायब तहसिलदार, पोलीस उप निरीक्षक यांचे वेतन पेशकार, पोलीस हवालदार यांचे वेतन मंडळ अधिकारी यांच्या बरोबरीने असावा अशा प्रकारे महसुल विभागाच्या वेतनश्रेणी असावी अशी मागणी होती. त्याची दखल ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे घेण्यात आलेली नाही. | प्रस्ताव सादर करावा. | **का.क्र. ३० :-** या कार्यालयाचे पत्र क्र.पोमसं/३०/३३/वेतन पुर्नरचना शिफारशी/७ वा वेतन आयोग/१७३/२०१७, दि. १७/०२/२०१८ अन्वये करण्यात आली होती. त्याची दखल ७ व्या वेतन आयोग समितीने घेतलेली नाही. तथापि, या कार्यालयाच्या दि. २३/०२/२०१८ च्या पत्रान्वये वेतन त्रुटी समितीकडे फेर प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. ज्यावेळी खंड-२ प्रकाशित होईल, त्यावेळी दखल घेण्याची शक्यता आहे.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.** | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| २०. | **मुद्दा क्र.३५**<br>पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण<br><br>**वि.पो.म.नि., प्रशासन उप सहा., लेखा का.क्र. ३०** | ६ व्या वेतन आयोगा प्रमाणे पोलीस नाईक यांना रु.४८०/- विशेष वेतन भत्ता देय होता. आता ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे उडविण्यात आलेला आहे. तरी तो रु.४८०/- वरुन रु.९८०/- करण्यात यावा अशी पोलीस कर्मचारी यांची विनंती आहे. | शासनास प्रस्ताव पाठविण्याबाबत निर्देश दिले. | **का . क्र. ३० :-** ७ व्या वेतन आयोगानुसार पोलीस नाईक पदास विशेष वेतन मंजूर होणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं/३०/कर्मचारी वृंद परिषद/५० वी सभा/२३०/२०१८, दि. १०/०७/२०१९ अन्वये शासनास सादर करण्यात आलेला असून, समक्रमांकित दि. ३०/१०/२०१९ व दि. ०९/१२/२०१९ रोजी शासनास स्मरणपत्र पाठविण्यात आले आहे. तथापि, शासन आदेश अद्याप प्रलंबित आहेत.<br>प्रस्तुत प्रकरणी गृह विभागातील पोल - ५ ब मध्ये अपर मुख्य सचिवांना नस्ती सादर केल्याचे सांगण्यात आले. लवकरच निर्णय होण्याची शक्यता आहे.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.** | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| २१. | **पोलीस अधीक्षक, नांदेड**<br>**वि.पो.म.नि., प्रशासन व.उ.स., नि. वे.**<br><br>**का.क्र. २८** | Cellullis due to Diabeties यामुळे नंतर होणारे गँगरीन व Mully Organ Failuer या आजाराची ट्रिटमेंट दिर्घ मुदतीची व खर्चिक असल्याने, ती कर्मचाऱ्यांना परवडत नाही. तरी हा आजार पोलीस कुटूंब आरोग्य योजनेतंर्गत समाविष्ठ करावा. | सदरचा आजार समाविष्ट करण्याबाबत शासनास प्रस्ताव पाठविण्याबाबत निर्देश दिले. | **का.क्र. २८ :-** शासनाच्या आरोग्य विभागाने विहित केलेल्या एकूण ३२ आजारांव्यतिरिक्त, मधुमेहामुळे होणारे Cellulitis, गँगरीन व Multy Organ Failure. या नमूद आजारांचा मपोकुआ योजनेअंतर्गत आंतररुग्णालयीन औषोधोपचार विनामुल्य देण्यासाठी तसेच, सर्व शासकीय कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंवियांवर खाजगी रुग्णालयात आंतररुग्णालयीन औषोधोपचाराच्या खर्चाची वैद्यकिय प्रतिपुर्ती करण्यासाठी शासनास (गृह विभाग) या कार्यालयाकडून दि.५/९/०७, २४/२/१६, २७/४/१६, ९/१/१९, २६/२/१९, ५/७/१९ आणि दि.२५/११/१९ अन्वये प्रस्ताव व स्मरणपत्रे सादर केली आहेत. त्या अनुषंगाने शासनाने उपस्थित केलेल्या मुद्यांवरील माहिती / अभिप्राय या कार्यालयाचे पत्र दि. ३/२/२०२० अन्वये शासनास सादर केले असुन शासन आदेश अप्राप्त आहेत. सदरहू बाब शासन आरोग्य विभागाच्या अखत्यारित असल्याने, **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.** | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| २२. | श्री. राजेंद्र बापूराव जगताप,<br>सहायक पोलीस उप निरीक्षक,<br>पुणे शहर<br><br>**अपर पो.म.सं., धोरण कार्यासन क्र. ४४.** | लेदर बुट उन्हाळयात गरम होते / पावसाळयात भिजतो. त्यामुळे आधुनिक (कमी वजनाचा) स्पोर्ट शुजबाबत विचार व्हावा. | अपर पोमसं, नि. व स. / रारापोबल यांनी चर्चा करुन याबाबत अभ्यास करावा व अहवाल सादर करावा. | **का. क्र. ४४ :-** सध्याच्या बदललत्या परिस्थिती अनुरुप, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न हाताळण्याच्या पध्दतीमध्ये झालेले बदल झाले आहेत. BPRD चा अहवाल त्याचप्रमाणे महाराष्ट्र पोलीसांच्या गणवेष विषयक गरजा व सोयी याचा अभ्यास करुन वेगवेगळया वातावरणारुप वापरण्यास व वावरण्यास सोप्या अशा नवीन साहित्यांचा गणवेषात समावेश व काहीमध्ये सुधारणा करुन प्रमाणके ठरविण्याचे व महाराष्ट्र पोलीसांच्या गणवेषाच्या सद्य:स्थितीचा अभ्यास करण्याचे काम पोलीस महासंचालक कार्यालयातील प्रकल्प सुधारणा कक्षाकडून सध्या चालू आहे. यामध्ये पोलीसांचे बुट व पारंपारिक खाकी गणवेषामध्ये बदल करण्याचा मुद्दा देखील समाविष्ठ आहे.<br>उपरोक्त मुद्दा समाविष्ठ करण्याबाबत विचार विनिमय करुन अंतिम निर्णय घेण्यात येईल. | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| २३. | श्री. अनिल उत्तम काळे,<br>पो.ह.क्र. १५५८,<br>पुणे ग्रामीण<br><br>**विपोमनि, आस्थापना कार्यासन क्र. ९** | पुणे जिल्हा परिषदेच्या ज्या शिक्षकांना जिल्हा परिषदेचा पुरस्कार मिळाल्यानंतर जादा वेतनवाढ चालू आहे. परंतु पोलीस खात्याची गेली १० वर्षापेक्षा जास्त दिवस झाले ज्या DG Insignia मिळाले. त्यांना वेतनवाढ झाली नाही. | शासनास प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. पाठपुरावा करण्यात यावा. | **का. क्र. ९ :-** या कार्यालयाचे पत्र दि. ८/११/२००६ अन्वये पोलीस महासंचालक यांचे सन्मानचिन्ह धारकांना दरमहा रु. ५००/- इतके विशेष वेतन मंजूर करण्याबाबत शासनास प्रस्तावित करण्यात आले असून, यापूर्वी वारंवार दि. २५/१२/२००७, दि. ०२/०९/२००८, दि. ०७/०९/२००९, दि. १३/०४/२०१०, दि. २५/०६/२०१३, दि. ११/११/२०१४, दि. २०/०३/२०१७, दि. १०/०५/२०१८, दि. १४/०६/२०१९ ची स्मरणपत्रे पाठविण्यात आली आहेत. दि. २६/१२/२०१९ रोजी शासनास स्मरणपत्र पाठविण्यात आले आहे. सदर प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहेत.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.** | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| २४. | श्री. पी. पी. खडपकर, राखीव पो. उप नि., रारापोबल, गट क्र.१, पुणे<br><br>**विपोमनि, आस्थापना / प्रशासन कार्यासन क्र.३ (नोडल डेस्क) / ८** | भरती झालेपासून ते सेवा कालावधी पुर्ण होईपर्यंत वार्षिक रजा प्रतिवर्ष ३० दिवस. **उदा. २० वर्ष सेवा X ३० (दिवस रजा) = ६००** परंतु ३०० वर रजा जात असल्यास पुढील सेवा चालू आहे. तरीही ३०० वर रजा जमा होत नाही. तर ३०० रजा होत असेल व रजा भोगल्या आहेत तर ३०० मधून वजा केली जाते. ३००-३०+२७०. म्हणजेच पुढे सलग (रजा भोगता आली नसल्यास) जमा होत नाही. | सेवानिवृत्ती पर्यंतच्या ३०० दिवसांची रजा धरण्यात येणार. त्यापेक्षा जास्त रजा असतील तर त्या रद्द होणार. रजेच्या तरतूदी संदर्भात स्पष्टता करण्याचे निर्देश दिले. | **का.क्र. ३ व ८:-** शासन निर्णय, वित्त विभाग क्र.अरजा २४०१/८/सेवा-९, दि. १५/०१/२००१ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ नुसार सध्या अस्तित्वात असलेली अर्जित रजा साठविण्याची, तसेच सेवानिवृत्तीच्या वेळी अर्जित रजेचे रोखीकरण करण्याची २४० दिवसांची मर्यादा ३०० दिवसांपर्यंत वाढविण्यात आली आहे.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.** | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| २५. | श्री. एस्. के. देशमुख, पो.ह.क्र. १६४, रारापोबल, गट क्र.५, दौंड<br>**अपर पोमसं, रारापोबल, मुंबई विपोमनि, प्रशासन कार्यासन क्र. ३०** | राज्य राखीव पोलीस बलासाठी बंदोबस्ताच्या ठिकाणी रहाण्याची सोय चांगली व्हावी.<br>राज्यात व राज्याबाहेर प्रवास भत्ता व इतर भत्त्यांमध्ये वाढ व्हावी. तसेच केंद्राप्रमाणे राशन भत्ता मिळावा | | **का. क्र. ३० :-** अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी शासनास उद्देशून दि. १८/०२/२०१९ रोजी या कार्यालयास सादर केलेला राज्याबाहेरील दैनिक भत्त्यामध्ये सुधारणा होणेबाबतछ चा प्रस्ताव या कार्यालयाचे क्र. पोमसं/३०/रा.दै.भ.-रारापोबल क्र.८/४४/ २०१९, दि. २४/०६/२०१९ अन्वये शासनास सादर करण्यात आलेला असून, समक्रमांकित दि. ३०/१०/२०१९ व दि. ०९/१२/२०१९ रोजी शासनास स्मरणपत्रे पाठविण्यात आले आहे. शासन आदेश अद्याप प्रलंबित आहेत. पोलीस अधिकारी / कर्मचारी यांच्या सर्व भत्त्यांबाबतचे निर्णय एकत्रितपणे शासनाकडून घेण्याची शक्यता आहे.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.** | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

# ५२ व्या कर्मचारी वृंद परिषदेच्या बैठकीमध्ये उपस्थित केलेल्या मुद्दयांवर झालेली / सुरु असलेली कार्यवाही.

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. जनार्दन वसंत पाटील, सहायक पोलीस निरीक्षक महामार्ग सुरक्षा पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई **( सभासद )** | महाराष्ट्र राज्य पोलीस दलाचे आधुनिकीकरण करुन, पोलीस अधिकारी / अंमलदार यांचेकरिता वेब पोर्टल व मोबाईल ॲप्लीकेशन तयार करण्यात यावे. | **संगणक कक्ष :-** महाराष्ट्र पोलीस दलाचे आधुनिकीकरणांतर्गत महाराष्ट्र पोलीस संकेतस्थळ (वेब पोर्टल) (www.mahapolice.gov.in) विकसित करण्यात आलेले आहे. सदर संकेतस्थळावर राज्यस्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेसंदर्भात माहितीकरिता पोलीस वृंद परिषद नावाचे एक वेगळे बटन तयार करुन, त्यामध्ये परिषदेबाबतची माहिती ठेवण्यात आली आहे. सदरचे संकेतस्थळ हे पोलीस अधिकारी / अंमलदार तसेच सर्व नागरिक वापरु शकतात. महाराष्ट्र पोलीस संकेतस्थळ हे मोबाईल फ्रेंडली असल्याकारणाने कोणत्याही मोबाईल ब्राऊजरमधून वापरले जाऊ शकते. | नवीन वेब साईटचे काम सुरु असून, दीड महिन्यात ते पूर्ण होईल. त्यामुळे अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| २. | श्री. वामन सखाराम कोकाटे, पो.ह.वा.क्र. १८६८, पोलीस अधीक्षक, नांदेड **( सभासद )** | महाराष्ट्र राज्यातील पोलीस अधिकारी / कर्मचारी हे शासकीय कामकाज करता असतांना सामाजिक संघटना व पक्ष कार्यकर्ते तसेच सुशिक्षित व अशिक्षित तसेच सुज्ञ किंवा गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांकडून मारहाण किंवा जीवघेणे हल्ले होत आहेत आणि झालेल्या अन्यायाविरुध्द काही एकही प्रकारची संरक्षण यंत्रणा पाठीशी नसल्यासारखे पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना शासकीय काम करतांना व्यक्तीगत त्रास सहन करावा लागत आहे. तरी, याबाबत मा. पोलीस महासंचालक साहेब यांचे स्तरावर समिती किंवा समन्वय समितीची नियुक्ती करुन न्याय मिळण्यासाठी उपाययोजना होणेस विनंती आहे. | **कार्यासन क्र. २० :-** महाराष्ट्र राज्यातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेसह राज्यातील सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचेवर होणा-या हल्ल्यांच्या गुन्हयांबाबत राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडूनर मासिक माहिती संकलीत करण्यात येवून, त्याबाबत प्रतिमाह या कार्यालयाकडूनर शासनास अहवाल सादर करण्यात येतो. राज्यातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेसह इतर शासकीय अधिकारी व कर्मचारी हल्ल्यांच्या होणा-या घटनांबाबत भा.दं.वि. कलमान्वये सर्व संबंधीत पोलीस घटक प्रमुखांकडून तातडीने उचित कार्यवाही करण्यात येते. | सदर मुद्दयाच्या अनुषंगाने कार्यासन अधिकारी यांनी पोलीस महासंचालक यांचे स्तरावर समिती किंवा समन्वय समितीची नियुक्ती करण्याबाबत प्रकरण नस्तीवर सादर करावे. |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|
| ३. | श्री. आर. बी. जगताप, सहा.पो.उप.नि., नेम. पोलीस आयुक्त, पुणे शहर<br>**( सभासद )** | गुन्हयाचे शिक्षेचे प्रमाण वाढवणे आवश्यक असलेने मा. न्यायालयामध्ये सुरु असलेल्या केसचे सुनावणीवेळी (महत्त्वाचे केसेस) अधिकारी / कर्मचारी यांनी हजर ठेवलेस झालेल्या चुका व घ्यावयाची दक्षता याबाबतचे मार्गदर्शन (प्रात्यशिकासह) मिळेल याबाबत विचार व्हावा. | **कार्यासन क्र. २३ :-** गुन्हयातील दोषसिध्दीचे प्रमाण वाढविण्यासाठी न्यायालयीन खटल्यांच्या सुनावणीच्या दिवशी संबंधित तपासी अधिकारी यांनी आवश्यक त्या कागदपत्रांसह न्यायालयात हजर राहून, सरकारी वकीलांना परिपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत या कार्यालयाची परिपत्रके (१) क्र.पोमसं/२३/५४/न्यायालय-उपस्थिती/९४१/ २००९, दि. ०८/१०/२०१० (२) क्र.पोमसं/२३/५४/ न्यायालय-उपस्थिती/४३३-२०१६, दि. १८/०५/२०१६ व (३) क्र.पोमसं/ २३/५४/दोषसिध्दी/८९४/२००९-२०१६, दि. १२/०८/२०१६ अन्वये सर्व घटक प्रमुखांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. | अ.पो.म.सं. (प्रशिक्षण व खास पथके), म. रा., मुंबई यांनी याबाबत Refresher Course मध्ये न्यायालयीन प्रकरणाबाबत प्रत्यक्ष सुनावणी कार्यपध्दती (Procedure) चा प्रशिक्षणामध्ये समावेश करावा. अभिप्रायाच्या अनुषंगाने **चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| ४. | पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण | पोलीस अधिकारी / कर्मचारी हे दर ४ वर्षांनी कुटूंबासह महाराष्ट्र दर्शनकरिता रजा प्रवास सवलत देण्यात येते. पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना आरामदायी प्रवासाकरिता रेल्वेची क्लास ३ वातानुकूलित किंवा शिवशाही बसची सुविधा मिळण्यात यावी तसेच महाराष्ट्र दर्शनाचे देयक सादर करतांना साधारण बसचे तिकीट दर प्रमाणे बिल मंजूर होते. तरी, महाराष्ट्र दर्शन बिलामध्ये रेल्वेची क्लास ३ वातानुकूलित किंवा शिवशाही बसची जी तिकीट असेल त्या तिकीट दराने बिल मंजूर व्हावे. जेणेकरुन, पोलीस अधिकारी / कर्मचारी व कुटूंबियांना महाराष्ट्र दर्शन प्रवास आरामदायी व सुखाचा व्हावा. | **कार्यासन क्र. ३० :-** शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.रप्रस-१११४/प्र.क्र.११/सेवा-५, दि. १०/०६/२०१५ मधील मुद्दा क्र. ११ अन्वये राज्य शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना महाराष्ट्र दर्शन रजा प्रवास सवलत उपभोगण्याकरिता संबंधित अधिकारी / कर्मचारी धारण करीत असलेल्या पदाच्या ग्रेड वेतनानुसार (६ व्या वेतन आयोगानुसार) रेल्वे / जलमार्ग व सडक मार्गाने प्रवास केल्यास कोणत्या वर्गाचे भाडे (प्रतिपूर्ती) अनुज्ञेय ठरविली असून, याबाबत सविस्तर विवरण नमूद केले आहे.<br>सदर शासन निर्णय सर्व राज्य शासकीय कर्मचा-यांच्या सर्वकष विचार करुन, शासन स्तरावरुन निर्गमित केले असल्याने व धोरणात्मक निर्णय शासन स्तरावर होत असल्याने, केवळ पोलीस अधिकारी / कर्मचारी यांचेकरिता रेल्वेची वर्ग - ३ वातानुकूलित किंवा शिवशाही बसची सुविधा मिळण्याबाबतच्या प्रकरणी निर्णय घेणे प्रशासकीयदृष्टया संयुक्तिक होणार नाही. | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|
| ५. | श्री. विद्याधर घोरपडे, पो.उप.नि., नेम. प्राचार्य, पो.प्र.कें, मरोळ, मुंबई <br>**( सभासद )** | पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ, मुंबई या आस्थापनेवर कार्यरत असलेले पोलीस अधिकारी / कर्मचारी यांचे सातव्या वेतन आयोगापप्रमाणे प्रत्यार्पित रजेच्या देयकामध्ये वेतनाची गणना कशी करायची आहे याबाबत सुधारित शासन निर्णय निर्गमित न झाल्याने संभ्रम आहे, यास्तव प्रत्यार्पित रजेचे देयक कोषागारात सादर करता येत नाही. तरी, पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक दर्जाच्या अधिका-यांना सातव्या वेतन आयोगानुसार प्रत्यार्पित रजेचा लाभ मिळणेसाठी प्रत्यार्पित रजेच्या देयकामध्ये वेतनाची गणना कशी करण्यात यावी याबाबत शासन स्तरावर आदेश निर्गमित होणेबाबत. | **कार्यासन क्र. ३० :-** या कार्यालयाचे पत्र क्र.पोमसं/३०/अर्जित रजा प्रत्यार्पण/रोखीकरण/ पोलीस दल/१५०/२०१९, दि. ०२/११/२०१९ अन्वये रजेचे रोखीकरण ७ व्या वेतन आयोगानुसार प्रदान करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित होणेबाबत छ चा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. अद्याप शासन आदेश प्रलंबित आहेत. | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| ६. | श्री. शिवाजी एम. कनोजिया, सशस्त्र पो.ह.क्र. २५, रा.रा.पो.बल गट क्र. ४, नागपूर <br>**( सभासद )** | सातव्या वेतन आयोगानुसार पोलीस हवालदार पदाचे पोलीस कर्मचारी यांना सुधारीत वेतन निश्चिती प्रमाणे दि. ०१ जानेवारी, २०१६ पूर्वीचे पदोन्नती झालेले पोलीस हवालदार यांना ७ व्या वेतन आयोगानुसार वेतन वाढ न देता, त्यांना जुन्याच वेतन श्रेणीवर वेतनवाढ देण्यात आलेली आहे. परंतू, दि. ०१ जानेवारी, २०१६ चे नंतरचे जे पोलीस कर्मचारी पोलीस हवालदार पदावर पदोन्नती मिळालेली आहे. अशा पोलीस हवालदारांना ७ व्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती करतांना अतिरिक्त वेतन वाढ देण्यात आलेली आहे. म्हणजेच दि. ०१ जानेवारी, २०१६ रोजी नंतरचे सेवाज्येष्ठतेने वरिष्ठ पोलीस हवालदार पेक्षा दि. ०१ जानेवारी, २०१६ रोजी नंतरचे सेवाज्येष्ठतेने कनिष्ठ पोलीस हवालदारांना जास्त / अतिरिक्त वेतन श्रेणी देण्यात आलेली आहे. | **कार्यासन क्र. ३० :-** ७ व्या वेतन आयोगाच्या त्रुटी निराकरण करण्याकरिता वित्त विभागास प्रस्ताव सादर केलेला असल्याने व शासनाकडून खंड २ प्रकाशित होणार असल्याने सद्य:स्थितीत सदर मुद्याबाबत कोणतेही भाष्य करणे संयुक्तिक होणार नाही. | प्रस्तुत प्रकरणी कार्यासन क्र. ३० यांनी सभासदाने उपस्थित केलेल्या मुद्दा स्पष्ट करावा. |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|
| ७. | श्री. शिवाजी एम. कनोजिया,<br>सशस्त्र पो.ह.क्र. २५,<br>रा.रा.पो.बल गट क्र. ४, नागपूर<br>**( सभासद )** | पोलीस दलातील पोलीस कर्मचारी हे काही वेळेस अचानकपणे विविध प्रशिक्षणासाठी बाहेर ठिकाणी जातात. तसेच, नेहमी टपाल कामी इतर घटकात जाण्यासाठी प्रवास करीत असतात. किंवा बाहेर गावी बंदोबस्ताला प्रवास करीत असतात. तेव्हा उपरोक्त कारणांसाठी रेल्वेने किंवा एस.टी. बसने प्रवास करीत असतात. आरक्षण वेळेवर होत नसल्याने, सदर पोलीस कर्मचारी यांना जनरल तिकीट किंवा वाहन / बोगीमध्ये प्रवास करावे लागते. तसेच, त्यांना आसन / सिट उपलब्ध होत नाही. कृपया पोलीस कर्मचारी यांना आरक्षित आसन मिळण्यासाठी लष्कराप्रमाणे स्वतंत्र वाहन किंवा रेल्वची बोगी उपलब्ध होण्याकरिता आदेश निर्गमित होणेबाबत. | **कार्यासन क्र. ३० :-** या कार्यालयाचे पत्र क्र.पोमसं/३०/कर्मचारी वृंद परिषद/५० वी सभा/२३०/२०१८, दि. १४/०५/२०१९ अन्वये राज्यातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना शिवाशाही बसेस / शिवनेरी बसेसमध्ये तात्काळ रिझर्व्हेशन मिळण्याबाबत चा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. अद्याप शासन आदेश प्रलंबित आहेत.<br>या कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं/३०/ क.वृ.प/५२ वी सभा/४८/१७०/२०१९, दि. ११/१२/२०१९ अन्वये रेल्वे बोगी उपलब्ध होण्याकरिता अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई / पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई यांचेकडून अभिप्राय मागविण्यात आलेले आहेत. सदर अभिप्राय प्राप्त होताच कळविण्यात येतील. | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| ८. | श्रीमती सानिका उन्मेश गोंडाबे,<br>म.पो.शि.क्र.०६-०३११,<br>वाहतूक विभाग,<br>बृहन्मुंबई<br>**( सभासद )** | काही राज्यांमध्ये ( आंध्रप्रदेश ) पोलीस अधिकारी व कर्मचा-यांना १३ महिन्याचे वेतन दिले जाते. महाराष्ट्र पोलीस यांचे कामकाजाचे स्वरुप व कामाची वेळ पाहता त्याच धर्तीवर आम्हाला सुध्दा १३ महिन्याचे वेतन मिळण्याबाबत. | **कार्यासन क्र. ३० :-** राज्य शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना मासिक वेतन आगाऊ देण्याची तरतूद प्रचलित नियमांमध्ये नसल्यामुळे मागणी उचित वाटत नाही. | प्रस्तुत प्रकरणी अभ्यास करुन, अ.पो.म.सं. (विशेष कृती) यांनी प्रस्ताव शासनास सादर करावा.<br>अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन</th><th>उपस्थित केलेले मुद्दे.</th><th>कार्यासनाचे अभिप्राय</th><th>मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश</th></tr>
<tr>
<td>९.</td>
<td>श्रीमती सानिका उन्मेश गोंडाबे,<br>म.पो.शि.क्र.०६-०३११,<br>वाहतूक विभाग,<br>बृहन्मुंबई<br><br><u>( सभासद )</u></td>
<td>पोलीस अंमलदार व मंत्रालयीन कर्मचारी यांच्या वेतनामध्ये बरीच तफावत दिसून येते. ७ व्या वेतन आयोगात ही तफावत फारच मोठी आहे. मंत्रालयीन कर्मचारी यांचे वेतन जास्त असून, पोलीस अंमलदारांचे वेतन फार कमी आहे. तरी, आम्हाला मंत्रालयीन लिपिकांच्या वेतनश्रेणी नुसार पोलीस अंमलदारांना वेतनश्रेणी देण्यात यावी असलेली तफावत दूर करण्यात यावी ही विनंती.
<table>
<tr><th>पद</th><th>६ वा वेतन आयोग</th><th>७ वा वेतन आयोग</th></tr>
<tr><td>पो.शि. ते पो.ना.<br>०१ आश्वासिक प्रगती योजना.</td><td>५२००-२०२००+<br>२४०० ग्रेड पे + ४८० (वि.वे.)</td><td>२५५००-८११००<br>(एस ८)</td></tr>
<tr><td>पो.ना. ते पो.ह.<br>०२ आश्वासिक प्रगती योजना.</td><td>५२००-२०२००+<br>२५०० ग्रेड पे + ५०० (वि.वे.)</td><td>२६४००-८३६००<br>(एस ९)</td></tr>
<tr><td>पो.ह. ते स.पो.नि.<br>०३ आश्वासिक प्रगती योजना.</td><td>५२००-२०२००+<br>२८००</td><td>२९२००-९२३००<br>(एस १०)</td></tr>
</table>
<table>
<tr><th>पद</th><th>६ वा वेतन आयोग</th><th>७ वा वेतन आयोग</th></tr>
<tr><td>क.लि. ते व.लि.<br>०१ आश्वासिक प्रगती योजना.</td><td>५२००-२०२००<br>+२४०० ग्रेड पे</td><td>२५५००-८११००<br>(एस ८)</td></tr>
<tr><td>व.लि. ते प्र.लि.<br>०२ आश्वासिक प्रगती योजना.</td><td>९३००-३४८००<br>+४२०० ग्रेड पे</td><td>३५४००-११२४००<br>(एस १४)</td></tr>
<tr><td>प्र.लि. ते का.अ.<br>०३ आश्वासिक प्रगती योजना.</td><td>९३००-३४८००<br>+४३०० ग्रेड पे</td><td>४१८००-१३२३००<br>(एस १५)</td></tr>
</table>
</td>
<td><u>कार्यासन क्र. ३०</u> :- पोलीस कर्मचारी व मंत्रालयीन कर्मचारी यांच्या वेतनश्रेण्या वेगवेगळया असल्याने तफावत दिसून येते.<br>पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे स्तरावर दि. २५/०७/२०१९ रोजी आयोजित केलेल्या पोलीस वृंद परिषदेमध्ये श्री. नरेंद्र शिवाजी वेलणकर, पोलीस हवालदार चालक क्र. २८६१०/ मो.प.वि. यांनी उपस्थित केलेल्या पोलीस अंमलदारांच्या वेतनामध्ये असलेल्या तफावतीच्या मुद्दयांच्या अनुषंगाने, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी या कार्यालयास सादर केलेल्या दि. १०/१०/२०१९ च्या पत्रासह या कार्यालयाच्या दि. ०२/११/२०१९ च्या पत्रान्वये ७ व्या वेतन आयोगानुसार पोलीस हवालदार यांना वेतनस्तर-१० आणि सहायक पोलीस उप निरीक्षक पदास वेतनस्तर-१२ मंजूर करण्याबाबत शासनास पत्रव्यवहार करण्यात आला आहे. शासन आदेश अद्याप प्रलंबित आहेत.</td>
<td>अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.</td>
</tr>
</table>

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|
| १०. | श्री. तानाजी पाटील, पो.शि.क्र. २६४०, ठाणे शहर **( सभासद )** | राज्य शासनाच्या इतर खात्यामध्ये पदोन्नतीचे स्तर जास्त आहेत. त्यामुळे एकाच वेळी वेगवेगळया विभागात भरती होणारा कर्मचारी यांचे सेवानिवृत्ती पर्यंत त्यांचे हुद्दयात व वेतनात बरीच तफावत आढळून येते. त्यामुळे इतर खात्याप्रमाणे पोलीस खात्यातील कर्मचारी यांना पदोन्नती व वेतनवाढ देण्यात यावी. | **कार्यासन क्र. ३० :-** शासनाच्या इतर विभागातील व पोलीस विभागातील पदोन्नतीच्या स्तरामुळे हुद्यात व वेतनात होणारी तफावत दूर होऊन, एकसमान येण्याकरिता शासनाने १०-२०-३० वर्षानंतर वर्षानंतर पुढील टप्प्याचे वेतन देण्याकरिता आश्वासित प्रगती योजनेमध्ये आवश्यक तो बदल केलेला आहे. | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| ११. | श्री. उमेश एस. लोणारे, पो.ह.क्र. १५९ पोलीस प्रशिक्षण केंद्र, नागपूर **( सभासद )** | राखीव पोलीस निरीक्षक / राखी पोलीस उप निरीक्षक यांची पदे ही राज्य राखीव पोलीस दलात पदोन्नतीने वेळीच भरण्यात येतात. त्याचप्रमाणे, या घटकातील देखील सदरहू पदे ही पदोन्नतीने वेळीच भरण्यात यावी. | **कार्यासन क्र. ३-अ :-** राखीव पोलीस उप निरीक्षक ते राखीव पोलीस निरीक्षक आणि सशस्त्र सहा. पोलीस उप निरीक्षक व पोलीस हवालदार ते राखीव पोलीस उप निरीक्षक पदी पदोन्नती देण्याकरिता सन २०१९-२० (०१/०९/२०१९ ते ३१/०८/२०२० ) या कालावधीसाठी निवडसूची तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदरची कार्यवाही सुरु होताच रिक्त पदे भरण्यात येतील. | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| १२. | पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण | संवेदनशील शहर किंवा संवेदनशील गावामध्ये काही कारणाने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो, तेव्हा मोठया प्रमाणामध्ये बाहेरील जिल्हयामधून पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना बंदोबस्ताकरिता बालावण्यात येते बंदोबस्ताकरिता आलेले पोलीस अधिकारी / कर्मचारी यांची बंदोबस्तादरम्यान राहण्याची व जेवणाची व्यवस्था करण्यात यावी. | **कार्यासन क्र. २०-अ :-** सदरचा मुद्दा हा यापूर्वी श्री. विजय पवार, अपर पोलीस अधीक्षक, सातारा यांनी राज्य स्तरीय कर्मचारी वृंद परिषदेच्या ४९ व्या सभेमध्ये उपस्थित केला असता, त्यावर मा. अध्यक्षांनी दि. २४/०७/२०१८ रोजी च्घटक प्रमुखांनी त्यांचे घटकात दरवर्षी होणा-या बंदोबस्ताचा आढावा घेऊन, बंदोबस्तातील पोलीस अधिकारी / कर्मचारी यांच्या राहण्याच्या सोईसाठी आवश्यकतेनुसार निधीची योग्य ती तरतूद अर्थसंकल्पात करण्याबाबत तसेच अतिरिक्त राहण्याची व्यवस्था ठिकठिकाणी तंबू उभारुनही करावीछ असे निर्देश दिले आहेत.<br>या सभेच्या कार्यवृत्तांताची प्रत या कार्यालयाचे ज्ञाप क्र.पोमसं/१६/३६९९/क.वृं.प.-४९ वी सभा/४८/२०१६, दि. ३०/७/२०१८ अन्वये सर्व पोलीस घटकांना पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली आहे. | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|
| १२. | पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण | | त्याचप्रमाणे, या कार्यालयाचे परिपत्रकीय ज्ञाप क्र.पोमसं/२०-अ/३४-अ/ क.वृं.प.-४९/७२/२०१६-१८, दि. ०१/०९/२०१९ अन्वये देखील सर्व पोलीस आयुक्त व सर्व पोलीस अधीक्षकांना त्यांचे घटकात दरवर्षी होणा-या बंदोबस्ताचा आढावा घेऊन, बंदोबस्तातील पोलीस अधिकारी / कर्मचारी यांच्या राहण्याच्या सोईसाठी आवश्यकतेनुसार निधीची योग्य ती तरतूद अर्थसंकल्पात करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहे.<br>एकंदरीत या मुद्दयावर मा. अध्यक्षांनी दिलेल्या आदेशानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात आली आहे. तरी, सदरचा मुद्दा पुन्हा चर्चेसाठी न ठेवता, निकाली काढण्यास विनंती आहे. | |
| १३. | श्री. आर. बी. जगताप,<br>सहा.पो.उप.नि.,<br>पुणे शहर<br>**( सभासद )** | महाराष्ट्र कुटूंब आरोग्य सेवा अंतर्गत पोलीस दलातील अधिकारी / कर्मचारी यांना पुणे शहरातील वेगवेगळया हॉस्पिटलमध्ये सेवा (आरोग्य) पुरविली जाते. परंतू, पुणे शहर हे मध्यवर्ती ठिकाणी व अत्याधुनिक सुविधा असलेले हॉस्पिटल असलेने, पुणे, सातारा, कोल्हापूर, बीड, सांगली इत्यादी जिल्हयातून पोलीस कुटूंबातील रुग्ण येत असलेने संबंधित हॉस्पिटलचे आर्थिक बजेट वाढते व त्या बजेटची पूर्तता वेळेत न केल्यास अथवा आर्थिक देणे प्रलंबित राहिल्यास संबंधित हॉस्पिटल उपचाराकरिता असमर्थता दर्शवितात. त्यामुळे योग्य नियोजन होणेबाबतचा विचार करणे आवश्यक आहे. | **कार्यासन क्र. २८ :-** सद्य:स्थिती महाराष्ट्र पोलीस कुटूंब योजनेंतर्गत उपचारासाठी पुणे जिल्हयातील १९ रुग्णालये पॅनलवर आहेत. त्यांची यादी www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर Flash मध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे.<br>महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनेच्या पॅनलवरील रुग्णालयांशी करण्यात आलेल्या करारानरुसार प्राप्त वैद्यकीय देयकाची प्रतिपूर्ती शासन अनुदान उपलब्धतेच्या अधिन राहून, सर्वसाधारणत: वैद्यकीय देयक प्राप्त झाल्यापासून ९० दिवसांच्या आत केली जाते.<br>रुग्णालयाकडून प्राप्त होणा-या देयकांच्या रकमेवर कोणतीही आर्थिक मर्यादा नाही. त्यामुळे रुग्णालयाचे आर्थिक बजेट वाढण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|
| १४. | श्री. शिवाजी एम. कनोजिया, सशस्त्र पो.ह.क्र. २५ रा.रा.पो.बल गट क्र. ४, नागपूर **( सभासद )** | महाराष्ट्र राज्य पोलीस कुटूंब आरोग्य योजनेअंतर्गत रुग्णालयात उपचार घेण्याकरिता दाखल होणारे रुग्णांना शासनाकडून ३२ गंभीर आजारांवर विनामुल्य उपचार मिळत असते. सद्य:स्थितीत आजारांचे वाढते प्रमाण लक्षात घेता, महाराष्ट्र राज्य पोलीस कुटूंब आरोग्य योजनेत आणखी नवीन अतिरिक्त आजार समाविष्ठ करुन, ३२ आजारांव्यतिरिक्त संबंधित आजारांवर मोफत उपचार मिळावे. तसेच, समाविष्ठ न होणारे आजारांना पोलीस कल्याण योजनेंतर्गत आर्थिक मदत मिळण्याबाबत. | **कार्यासन क्र. २८ :-** शासनाने शासन निर्णय, गृह विभाग, क्र.पीडब्लूएफ १२०४/१४३/प्र.क्र.२/भाग-३/पोल-७, दि. २८/०७/२००६ नुसार शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.एमएजी २००५/९/प्र.क्र.१/आ.३, दि. १९/०३/२००५ अन्वये निश्चिती केलेल्या २७ आकस्मिक व ५ गंभीर अश्या एकूण ३२ आजारांवर आंतररुग्णालयीन औषधोपचार विनामुल्य देण्याची तरतूद विहित केली आहे.<br>शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.संकिर्ण २०१३/प्र.क्र.२१९/आरोग्य ५, दि. ०४/०९/२०१३ अन्वये नक्षलग्रस्त जिल्हयाकरिता मलेरिया या आजारावर उपचार विनामुल्य देण्याची तरतूद विहित केली आहे.<br>त्याव्यतिरिक्त खालील आजार महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनेंतर्गत समाविष्ठ करण्याबाबत या कार्यालयाच्या क्र.२८/४९३७/मपोकुआयो/२३७/२००६, दि. २४/०२/२०१६ च्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला असून, त्यावरील शासन आदेश अद्याप प्रतिक्षाधिन आहेत :-<br>Hysterectomy Surgery / High Grade Fever (Dengue, Leptospirosis, Chikungunia, Malaria) / Pelvic Inflamatory Diseases related Surgery (Related to Women)/ Liver diseases /Implant / Removal / Secondary Surgeries.<br>तसेच या कार्यालयाच्या क्र.पोमसं/२८/ ४९३७/ मपोकुआयो-मलेरिया/४७/ २०१३, दि. ०५/०७/२०१९ च्या पत्रान्वये मधुमेह या आजाराचा व त्याच्यापासून उदभवणा-या Cellulities, गैंगरीण व Multy Organ Failure या आजाराचाही महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनेंतर्गत आंतररुग्णालयीन औषधोपचाराकरिता समावेश होण्याबाबत शासनास विनंती करण्यात आली आहे. | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|
| १५. | श्री. तानाजी पाटील, पो.शि. क्र. २६४०, ठाणे शहर **( सभासद )** | कुटूंब आरोग्य योजनेमध्ये त्या व्यक्तीवर अवलंबून असणा-या व्यक्तीचा देखील समाविष्ठ करण्यात यावा. | **कार्यासन क्र. २८ :-** शासन निर्णय, गृह विभाग क्र.पीडब्लूएफ-१२०४/१४३/प्र.क्र.२/भाग-३/पोल-७, दि. २८/०७/२०१९ अन्वये महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी राज्य पोलीस दलातील सर्व प्रवर्गातील अधिकारी / कर्मचारी यांच्यासह त्यांच्यावर अवलंबून असलेल्या महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) अधिनियम, १९६१ मधील नियम २ (३) मधील कुटूंब या सज्ञेअंतर्गत समाविष्ठ असणा-या व्यक्ती पात्र राहतील असे नमूद आहे.<br>त्या अनुषंगाने सदर अधिनियम, १९६१ मध्ये कुटूंब म्हणजे १. शासकीय कर्मचा-यांची पत्नी किंवा पती<br>२. शासकीय कर्मचा-यावर अवलंबून असतील अशी शासकीय कर्मचा-याची औरस मुले, सावत्र मुले, कायदेशीर घेतलेली मुले<br>३. शासकीय कर्मचा-यावर पूर्णपणे अवलंबून असलेले शासकीय कर्मचा-यांचे आई-वडिल (टिप-महिला शासकीय कर्मचा-याला तिच्यावर पुर्णपणे अवलंबून असलेल्या आणि तिच्या बरोबर राहत असलेल्या तिच्या आई-वडिलांची किंवा तिच्या सासु-सास-यांची निवड करता येईल.)<br>४. शासकीय कर्मचा-यांवर पुर्णपणे अवलंबून असलेला १८ वयाखालील अविवाहित भाऊ<br>५. शासकीय कर्मचा-यावर पुर्णपणे अवलंबून असलेल्या अविवाहित बहिणी व घटस्फोटीत बहिणी (वय लक्षात न घेता)<br>तसेच, शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.वैखप्र-२०१७/प्र.क्र.६१४/राकावि-२, दि. ०२/०८/२०१९ मध्ये शासकीय कर्मचा-यांच्या आई-वडिलांना १) निवृत्ती वेतन मिळत असेल किंवा निवृत्ती वेतन मिळत नसेल, तरी अन्य मार्गांनी उत्पन्न मिळत असेल किंवा निवृत्ती वेतनासह अन्य मार्गांनी उत्पन्न मिळत असेल तर अशा सर्व प्रकरणी, उपचार घेतेवेळी त्यांचे सर्व मार्गांनी मिळणारे एकूण उत्पन्न हे दरमहा रु. ९,०००/- इतके मुळ निवृत्ती वेतन घेणा-या सेवानिवृत्त राज्य शासकीय कर्मचा-यास मिळणा-या वित्तलब्धीच्या मर्यादेत (म्हणजे रु. ९,०००/- अधिक त्यावरील उपचार सुरु करण्याच्या दिनांकास अनुज्ञेय असणारी महागाई वाढ) असेल तर ते वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या प्रयोजनासाठी शासकीय कर्मचा-यावर अवलंबित असल्याचे मानले जाईल.<br>तसेच, सदर तरतूद शासकीय कर्मचा-याच्या अविवाहित बहिणीचे आणि घटस्फोटीत बहिणीचे त्यांच्यावरील अवलंबित्व ठरविताना तसेच महिला शासकीय कर्मचा-याने तिच्या आई-वडिलांऐवजी सासु-सास-यांची निवड केली असेल तर अशा प्रकरणी सासु-सास-यांचे तिच्यावरील अवलंबित्व ठरवितानाही लागू असेल, असे नमूद आहे. | कार्यासन क्र. २८ यांनी संबंधित शासन निर्णयाची प्रत सभासद श्री. तानाजी पाटील, पो.शि.क्र. २६४०, ठाणे शहर यांना उपलब्ध करुन दयावी.<br><br>अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|
| १६. | पो.ह. / १५५८ अनिल उत्तम काळे, नेम. पुणे ग्रामीण **( सभासद )** | पोलीस स्टेशनकडून मयताचा व्हिसेरा केमिकल ॲनालायजरी या ठिकाणी तपासणीकामी नेणेकरिता त्याला लागणारी बॉटल (छोटी पेटी) ही खाजगी ठिकाणाहून पोलीसांना मेडीकल अधिकारी हे घेऊन येण्यास सांगतात. कधी कधी सदरची बॉटल ही चांगल्या प्रतीची नसल्याने ती प्रवासामध्ये फुटते, त्यामुळे पोलीस कर्मचा-यांना विविध गोष्टींना तोंड दयावे लागते. त्याकरिता पोलीस स्टेशनकडून चांगल्या प्रतीच्या बॉटल उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. | **कार्यासन क्र. २२ :-** पो.ह. / १५५८ अनिल उत्तम काळे, नेम. पुणे ग्रामीण यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने मयताचा व्हिसेरा केमिकल ॲनरालायजरी या ठिकाणी तपासकामी नेणेकरिता चांगल्या प्रतीच्या बॉटल पोलीस स्टेशनला उपलब्ध करुन देणे व त्याबाबतचा होणारा खर्च हा तपास निधीतून भागविण्याबाबत राज्यातील सर्व पोलीस घटक प्रमुखांना परिपत्रकान्वये सूचना निर्गमित करण्यात येतील. | कार्यासन अधिकारी यांनी सदरबाबत प्रत्येक पोलीस घटकांसाठी तपास निधी दिला जातो. त्यातून, मागणी केलेल्या वस्तूंचा खर्च भागविण्याबाबत परिपत्रक निर्गमित करावे. अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| १७. | श्री. व्ही. के. राऊत, पोलीस उप निरीक्षक, रा.रा.पो.बल गट क्र. १४, औरंगाबाद<br><br>श्री. जी. ए. मेटकरी स.पो.शि/५१७ नेम. रा.रा.पो.बल गट क्र. १४, औरंगाबाद | **महाराष्ट्र राज्यातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे अनुज्ञेय असलेल्या प्रवास भत्त्यामध्ये सुधारणा होणेबाबत :-** महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील विशेष करुन, राज्य राखीव पोलीस बलातील पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच वर्ग-४ कर्मचारी हे राज्यांतर्गत / नक्षल / इतर राज्य / लोकसभा / विधानसभा इत्यादी बंदोबस्ताकरिता वेगवेगळया ठिकाणी जात असतात. त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य, शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रवास-१०१०/प्र.क्र.२/सेवा-५, दि. ०३/०३/२०१० अन्वये दिलेल्या अ.क्र. ९ दैनिक भत्ता (मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ मधील नियम ४२० ) दि. १९/०६/२००६ च्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करुन, खालील प्रमाणे सुधारणा करण्यात आलेली आहे. परंतू, सद्या शासनाने लागू केलेल्या ७ व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने तसेच वाढत्या महागाईच्या अनुषंगाने त्यामध्ये पुन्हा सुधारणा करणे अत्यंत आवश्यक आहे. | **कार्यासन क्र. ३० :-** शासन निर्णय, वित्त विभाग, दि. ०३/०३/२०१० नुसार अनुज्ञेय प्रवासभत्ता हा सर्व राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना अनुज्ञेय ठरविण्यात आला आहे.<br>सदर शासन निर्णय सर्व राज्य शासकीय कर्मचा-यांचा सर्वकष विचार करुन, शासन स्तरावरुन निर्गमित केलेले असल्याने व धोरणात्मक निर्णय शासन स्तरावर होत असल्याने केवळ पोलीस अधिकारी / कर्मचारी यांचेकरिता वाढीव प्रवासभत्ता / दैनिक भत्ता मिळण्याबाबतच्या प्रकरणी निर्णय घेणे प्रशासकीयदृष्टया संयुक्तिक होणार नाही.<br>तथापि, अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, म.रा., मुंबई यांनी राज्याबाहेरील दैनिक भत्त्यामध्ये सुधारणा होण्याबाबत च्या विषयाच्या दि. १८/०२/२०१९ च्या पत्रानुसार या कार्यालयाच्या दि. २४/०६/२०१९ च्या पत्रान्वये शासनास ( गृह विभाग ) प्रस्ताव सादर करण्यात आला असून, त्यास या कार्यालयाच्या समक्रमांकीत दि. ३०/१०/२०१९ व दि. ०९/१२/२०१९ अन्वये स्मरणपत्रे काढण्यात आलेली आहेत. | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे. |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|
| १८. | श्री. व्ही. के. राऊत,<br>पोलीस उप निरीक्षक,<br>रा.रा.पो.बल गट क्र. १४, औरंगाबाद<br><br>श्री. जी. ए. मेटकरी<br>स.पो.शि/५१७ नेम. रा.रा.पो.बल गट क्र. १४, औरंगाबाद | **दैनिक भत्ता ८ किलोमीटर पलीकडे परंतू, नागरी हद्दीच्या आत केलेल्या प्रवासासाठी दैनिक भत्ता मंजूरीबाबत.**<br>महाराष्ट्र राज्य, शासन वित्त विभाग, शासन निर्णय प्रवास-१००५/प्र.क्र.१७/सेवा-५, दि. १०/०१/२००७ अन्वये ८ किलोमीटरच्या पलीकडे परंतू, नागरी हद्दीच्या आत केलेल्या प्रवासासाठी दैनिक भत्ता मंजूरीकरिता दैनिक भत्त्याचा दर सुधारनेनंतर मुंबईसह कोणत्याही मुख्यालयी कार्यरत असणा-या कर्मचारी यांनी ८ किलोमीटरच्या पलीकडे परंतू, त्या शहराच्या हद्दीत केलेल्या प्रवासासाठी त्या शहरासाठी अनुज्ञेय असलेल्या दरांच्या ५० टक्के दराने दैनिक भत्ता मंजूर करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.<br>महाराष्ट्र राज्यातीलह मुंबईसह कोणत्याही मुख्यालयाच्या ठिकाणापासून ५ किलोमीटरच्या पलीकडे परंतू, शहराच्या हद्दीत केलेल्या प्रवासासाठी त्या शहराच्या अनुज्ञेय असलेल्या १००% दराने दैनिक भत्ता मंजूर करण्याची तरतूद करण्यात यावी. | **कार्यासन क्र. ३० :-** प्रस्तुत प्रकरणी शासन स्तरावर उचित निर्णय घेण्याबाबत आगामी पोलीस कर्मचारी वृंद परिषदेमध्ये निर्णय झाल्यास त्याप्रमाणे पुढील कार्यवाही सत्वर करण्याबाबतची तजवीज ठेवण्यात आली आहे. | मुद्दा संयुक्तीक वाटत नसल्यामुळे, अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|
| १९. | पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण | महिला पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना पहिले अपत्य मुलगी झाल्यास रु. ५०००/- अनुदान दिले जाते. त्याचप्रमाणे, पुरुष अधिकारी / कर्मचारी यांचे पत्नीला पहिले अपत्य मुलगी झाल्यास रु. ५०००/- अनुदान दिले जावे. | **कार्यासन क्र. २८-अ :-** महिला पोलीस कर्मचा-यांच्या शारीरिक व मानसिक दृष्टया तणावपूर्ण कामाचे स्वरुप विचारात घेवून त्यांना गरोदरपणात चांगला आहार घेता यावा याकरिता रु. ५,०००/- विशेष पोषण आहार अनुदान देण्यात येते. सदर अनुदान पोलीस कल्याण निधीतून दिले जात असल्यामूळे पोलीस कल्याणा निधीच्या सदस्य असलेल्या महिला लिपिक वर्गीय कर्मचा-यांना सदर अनुदान अर्ध्या दराने म्हणजेच रु. २,५००/- मिळते.<br>सदरहू विशेष पोषण आहार अनुदान पोलीस दलात कार्यरत नसलेल्या पोलीस कर्मचा-यांच्या पत्नीस देण्याचा निर्णय घेण्यात आल्यास साधारणत: पुढीलप्रमाणे खर्च येईल :-<br>पोलीस कर्मचा-यांची सर्वसाधारण संख्या २,२०,००० व सरासरी ३५ वर्ष सेवा गृहीत धरल्यास २२०००० / ३५ X २ = १२५०१ व त्यापैकी २०% महिला कर्मचारी गृहीत धरल्यास उर्वरित पुरुषांच्या पत्नी १२५०१ X ८०% = १०,०००. सदर १०००० महिला कर्मचा-यांना रु. ५,०००/- प्रमाणे वर्षास साधारणत: ५ कोटी खर्च येईल. सदरचा बोजा मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी, घटक पोलीस कल्याण निधी व बृहन्मुंबई पोलीस कल्याण निधीवर येईल. यापैकी बृहन्मुंबई पोलीस दलातील २४% कर्मचारी वजा जाता उर्वरित कर्मचा-यांचा खर्च रु. ३.८० कोटी अपेक्षित आहे. | कार्यासन अधिकारी यांनी प्रकरण नस्तीवर सादर करुन, प्रस्ताव शासनास पाठविण्याबाबत कार्यवाही करावी. अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे. |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|
| २०. | श्री. उमेश एस. लोणारे<br>पो.ह.क्र.१५९<br>पो.प्र.कें., नागपूर<br>( सभासद ) | कुटूंब आरोग्य योजनेचा ( MPKY ) लाभ हा अधिकारी / कर्मचारी नोकरीवर असतांनाचा देण्यात येतो. तथापि, अधिकारी / कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर याबाबतचा लाभ हा त्यांना व त्यांच्या पत्नीला मिळत नाही. अधिकारी / कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांना मिळालेली रक्कम ही विशेष करुन घरबांधणी, मुलांचे शिक्षण व लग्नाकरिता खर्च होते. त्यामुळे प्रापंचिक उदरनिर्वाह व औषधोपचार फक्त त्यांचे निवृत्ती वेतनावरच भागवावा लागतो. अश्या परिस्थितीत काही गंभीर आजार झाल्यास आरोग्य विषयक गंभीर प्रश्न निर्माण होतो. करिता कुटूंब आरोग्य योजनेचा ( MPKY ) लाभ हा अधिकारी / कर्मचारी यांचे सेवानिवृत्तीनंतरही त्यांना व त्यांच्या पत्नीला देण्यात यावा. | कार्यासन क्र. २८ :- शासन निर्णय, गृह विभाग, क्र.पीडब्लूएफ-२०४/१४३/प्र.क्र.२/भाग-३/पोल-७, दि. २८/०७/२००६ मध्ये सेवानिवृत्ती, मृत्यू, बडतर्फी इत्यादी कारणांमुळे सेवेतून मुक्त झालेल्या लाभार्थीची नावे यादीतून कमी करण्याची तरतूद विहीत केलेली असल्याने सेवानिवृत्त पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनेंतर्गत उपचार अनुज्ञेय नाहीत.<br>४८ व्या पोलीस अधिकारी / कर्मचारी वृंद परिषदेमध्ये श्री. मंगेश अशोक महाडीक, पो.ना./४५१, सातारा यांनी सेवानिवृत्त पोलीस अधिकारी / कर्मचा-यांसाठी महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजना लागू करण्याबाबत उपस्थित केलेला मुद्दा मा. अध्यक्षांनी चर्चेअंती निकाली काढलेला आहे. | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे. |
| २१. | पो.ह./१५९ उमेश एस. लोणारे नेम. प्राचार्य, पो.प्र.कें., नागपूर<br>( सभासद ) | पोलीस प्रशिक्षण केंद्र येथे पोलीस उप अधिक्षकाचे पद हे रिक्त असून, सदरहू पद हे तात्काळ भरल्या गेले पाहिजे. पोलीस उप अधिक्षकांचे रिक्त पदाअभावी बाह्य वर्गातील अधिकारी / कर्मचारी यांचेवर प्रत्यक्षात नियंत्रण व देखरेख ठेवण्यास फार महत्त्वाचे आहे. (Dysp) करिता सदरहू पद हे यथाशिघ्र भरणेस विनंती केलेली आहे. | कार्यासन क्र. २ :- पोलीस प्रशिक्षण केंद्र, येथे राखीव पोलीस उप अधीक्षक या संवर्गाचे पद मंजूर नाही. त्यामुळे सदर पद भरण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. तरी, सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा. | पोलीस उप अधिक्षकांचे पद सार्वत्रिक बदल्या-२०२० पर्यंत भरण्यात येईल अशी माहिती वि.पो.म.नि. (आस्थापना) यांनी दिली आहे. त्यामुळे अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे. |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|
| २२. | श्री. जनार्दन वसंत पाटील, स.पो.नि. नेम. महामार्ग सुरक्षा पथक, म. रा., मुंबई **( सभासद )** | पोलीस उप निरीक्षक (सेवाप्रवेश) नियम १९९५ नुसार अधिका-यांची पदोन्नती, सेवानिवृत्त, राजीनामा, मयत, बडतर्फ यामुळे रिक्त झालेल्या पदांची वर्षनिहाय माहिती प्रसिध्द करण्यात यावी. | **कार्यासन क्र. ५ :-** पोलीस उप निरीक्षक यांची सेवानिवृत्ती, पदोन्नती, मयत, बडतर्फ याची मासिक माहिती कार्यासन क्र. ५ येथे उपलब्ध आहे. सदर माहिती प्रसिध्द केली जात नाही तसेच, सदर माहितीच्या आधारे व सेवाज्येष्ठता यादीनुसार पुढील पदावर पदोन्नती देण्यात येते. | सदर प्रकरणी भरती वेळेस रिक्त पदे भरतीबाबतची माहिती तयार करुन वेबसाईटवर टाकण्यात येईल. अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| २३. | श्री. जनार्दन वसंत पाटील, स.पो.नि. नेम. महामार्ग सुरक्षा पथक, म. रा., मुंबई **( सभासद )** | सन २०१३ मध्ये पोलीस उप निरीक्षक विभागीय परिक्षा पास झालेल्या पोलीस अंमलदार यांची संपूर्ण महाराष्ट्राची एकत्रित सेवाज्येष्ठता यादी प्रसिध्द करण्यात यावी. | **कार्यासन क्र. ५ :-** पोलीस उप निरीक्षक (भरती) नियम १९९५ मधील नियमामध्ये पाठविण्यात आल्याने सन २०१३ मध्ये पोलीस उप विभागीय परिक्षा उत्तीर्ण झालेल्यांची संपूर्ण महाराष्ट्राची एकत्रित सेवाज्येष्ठता यादी प्रसिध्द करण्यात आली नाही. | सदर प्रकरणी विशेष पोलीस महानिरीक्षक, (आस्थापना) यांना आवश्यक ती कार्यवाही करण्यास कळविले आहे. अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| २४. | श्री. जनार्दन वसंत पाटील, स.पो.नि. नेम. महामार्ग सुरक्षा पथक, म. रा., मुंबई **( सभासद )** | महाराष्ट्र राज्य पोलीस दलात कार्यरत असलेल्या सर्व पोलीस उप निरीक्षक यांची संपूर्ण एकत्रित सेवाज्येष्ठता यादी तयार करण्यात यावी. तसेच दरवर्षी यादीत सुधारणा करण्यात यावी. | **कार्यासन क्र. ५ :-** सेवाज्येष्ठतेमधील त्रुटीबाबत घटकाकडून माहिती मागविण्यात आली असून, ती अद्यावत करण्याचे कामकाज सुरु आहे. त्यामुळे पोलीस उप निरीक्षक यांची एकत्रित सेवाज्येष्ठता जानेवारी, २०२० मध्ये प्रसिध्द करण्यात येईल. | सदर प्रकरणाबाबत घटकांकडून मागविण्यात आलेली माहिती प्राप्त होताच सेवाजेष्ठता यादी प्रसिध्द करण्यात येईल. अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|
| २५. | पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण | पोलीस अधिकारी / कर्मचारी हे कर्तव्य बजावत असतांना शहिद होतात. शहिद झाल्यानंतर शहिदाचा प्रस्ताव मा. पोलीस महासंचालक, म. रा., मुंबई यांना पाठविण्यात येतो. तेथून सदर प्रस्ताव मंजूरीकरिता शासनाकडे पाठविण्यात येतो. तो प्रस्ताव शासनाकडे दिर्घकाळापर्यंत प्रलंबित राहतो. शहिदांचा प्रस्ताव मंजूर होईपर्यंत, शहिदांचया कुटूंबियांना वेतन दिले जात नाही. तरी, शहिद पोलीस अधिकारी / कर्मचारी यांचे कुटूंबियांना शहिद झाले महिन्यापासून वेतन किंवा उदरनिर्वाह भत्ता, पेन्शन लागू करण्यात यावी. | **कार्यासन क्र. २८-अ :-** नक्षलविरोधी कार्यवाही, अतिरेकी कार्यवाही, दरोडेखोरी व संघटीत गुन्हेगारी विरोधी कार्यवाही तसेच आपातकालीन काळात मदत करतांना मृत झालेल्या पोलीस अधिकारी / कर्मचा-यांच्या कुटुंबियांना मृत व्यक्ति मृत झालीच नव्हती असे मानून सदर व्यक्ती सेवेत असती तर वेळोवेळी त्या व्यक्तिला वेतन मिळाले असते (पदोन्नती व वेतनवाढीसह) ते वेतन मृत व्यक्तिच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत देय असल्याबाबत शासन निर्णय स्वयंस्पष्ट आहेत. त्यामुळे सदर वेतन सुरु करण्याकरिता नवीन शासन आदेशाची वाट पाहण्याची आवश्यकता नाही. इतर प्रकरणात सत्वर प्रोव्हिजनल पेन्शन सुरु करता येते. | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| २६. | समादेशक, रा.रा.पो.बल गट क्र. २, पुणे | यापूर्वी राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १, पुणे यांचे आस्थापनेवर सबसिडीअरी कॅन्टीन सुरु करणेस आली होती. परंतू, सदर कॅनटीनमध्ये आर्थिक अपहार झालेने, सदर कॅन्टीन बंद आहे. त्यामुळे, पोलीस अधिकारी / कर्मचारी व वर्ग-४ चे कर्मचारी यांना स्थानिक बाजारातूनर साहित्य खरेदी करावे लागल्याने आर्थिक नुकसान होत आहे. राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १, पुणे येथील सबसिडीअरी कॅन्टीन सुरु होणेबाबत सीआरपीएफ तळेगांव येथील अधिका-याशी चर्चा केली असता, त्यांनी स्पष्ट केले आहे की, सबसिडीअरी कॅन्टीनची थकीत रक्कम ६१ लाख ५६ हजार भरणा केला जात नाही, तोपर्यंत गट क्र. १, पुणे येथील सबसिडीअरी कॅन्टीन सुरु होणार नाही. सीआरपीएफ, तळेगाव यांनी नव्याने राज्य पोलीस बली गट क्र. २, पुणे यांचे आस्थापनेवर सबसिडीअरी कॅन्टीन सुरु होणेसाठी मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयामार्फत CPC, New Delhi यांना प्रस्ताव सादर करणेबाबत सांगणेत आलेले आहे. तरी, आपले कार्यालयाकडून सबसिडीअरी कॅन्टीन सुरु होणेच्या प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती आहे. | **कार्यासन क्र. २८-अ :-** प्रस्तुत प्रकरणी दिनांक २३.१२.२०१९ रोजी एम.एच.ए., नवी दिल्ली यांना प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|
| २७. | पोलीस आयुक्त, पुणे शहर<br>श्री. आर. बी. जगताप,<br>सहा.पो.उप.नि., नेम. मुख्यालय<br>**( सभासद )** | पुणे शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत पोलीस पाल्यासाठी (विद्यार्थी / विद्यार्थिनी) वसतीगृह, ग्रंथालय, गेस्ट हाऊस, स्वत:चे मालकीची इंग्लीश शाळा (नर्सरी / प्राथमिक) पाळणाघर, जिम, एमपीएससी, युपीएससी क्लासेस सुरु केलेले आहे. त्या धर्तीवर प्रत्येक जिल्हयात सुरु करावीत. (महत्त्वाचे शहरामध्ये) | **कार्यासन क्र. २८-अ :-**<br>सदरच्या योजना राबवण्याबाबत पोलीस कल्याण निधी मध्ये तरतूद आहे त्यानुसार प्रत्येक घटक प्रमुख त्यांच्या त्यांच्या गरजा व उत्पन्न विचारात घेऊन पोलीस कल्याण योजना राबवित असतो. | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| २८. | पो.शि. / २६४०, तानाजी पाटील, नेम. मुख्यालय, ठाणे शहर<br>**( सभासद )** | पोलीस पत्नी अथवा त्यांची मुले यांना व्यावसायिक शिक्षणाचे उपक्रम चालू करण्यात यावेत. | **कार्यासन क्र. २८-अ :-**<br>पोलीस कल्याण निधी नियमावलीमधील तरतूदीनुसार सदस्य व त्यांच्या कुटुंबियांच्या हितासाठी शिवणकाम, हस्त व्यवसाय, हवाबंदकरण, सुतारकाम व तत्सम व्यवसाय यांचे प्रशिक्षण वर्ग चालविण्याची तरतूद आहे. याशिवाय इतर काही उपक्रम चालविण्याचे असल्यास घटकांनी केलेल्या विनंतीवर विचार करता येईल. | अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| २९. | श्री. वामन सखाराम कोकाटे, पो.ह.वा./१८६८, नेम. पोलीस अधीक्षक, नांदेड<br>**( सभासद )** | नांदेड जिल्हयातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे शासकीय निवासस्थानाचे पावसाचे पाण्यामुळे नुकसान झाले आहे. तसेच, जुने शासकीय निवासस्थान जिर्ण झालेले आहेत. तरी, त्या शासकीय निवासस्थानाची दुरुस्ती होणेस विनंती आहे. | **कार्यासन क्र. १९-अ :-** पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी प्रस्ताव पाठवावा. प्रस्तावानुसार उपलब्ध निधीतून वितरीत करण्यात येईल. | पोलीस अधीक्षक, नांदेड यांचेकडून प्रस्ताव प्राप्त करुन घेऊन, त्यावर होणारा खर्च दुरुस्ती निधीतून करण्यात यावा.<br>अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|
| ३०. | सशस्त्र पो.ह. / २५ शिवाजी एम. कनोजिया, नेम. समादेशक, रा.रा.पो.बल गट क्र. ४, नागपूर<br>**( सभासद )** | नक्षल बंदोबस्त, गडचिरोली येथे जाणा-या राज्य राखीव पोलीस दलाच्या विविध गटातील कंपन्या या काही काळासाठी शस्त्राचे देवाण घेवाणासाठी मुक्कामास असतात, किंवा इतर बंदोबस्तासाठी गट मुख्यालयात थांबत असतात, तेव्हा सदर कंपन्यांच्या राहण्यासाठी सुसज्ज हॉल नसल्याने, त्यांना अडचण निर्माण होत असते. कृपया सुसज्ज अशी बॅरेक किंवा मोठा हॉल सर्व सुविधायुक्त करुन मिळण्याबाबत. | **कार्यासन क्र. २७-ब :-** या कार्यालयाच्या क्र.पोमसं/ २७/ रारापोबल/बॅरेक व हॉल/२२०/ २०१९, दि. ०६/१२/२०१९ च्या ज्ञापान्वये आणि दि. ०३/०१/२०२० च्या स्मरण ज्ञापान्वये सर्व पोलीस घटक तसेच सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल यांना सदर मुद्दयाच्या अनुषंगाने बॅरेक व हॉल बांधकामाची आवश्यकता असल्यास, त्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव आवश्यक कागदपत्रांसह या कार्यालयास पाठविण्याबाबत कळविण्यात आले आहे. | कार्यासन अधिकारी यांनी अ.पो.म.स. रारापोबल, मुंबई यांचे मार्फतीने समादेशक, रा.रा.पो.बल गट क्र. ४, नागपूर यांचेकडून प्रस्ताव प्राप्त करुन घेऊन, सदरचा प्रस्ताव नस्तीवर सादर करावा.<br>अभिप्रायाच्या अनुषंगाने चर्चेअंती **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| ३१. | श्री. ए. एस. कांबळे, पो.ना. /११३९, नेम. पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, पुणे<br>**( सभासद )** | रेल्वे प्रशासनाकडून रेल्वे सुरक्षा बलाचे प्रत्येक ठाणेवर रेल्वे सुरक्षा बल (RPF) कर्मचारी यांचेसाठी विश्रामगृह बांधून, देण्यात आलेले आहे. परंतू, रेल्वे पोलीसांना रेल्वे प्रशासनाकडून अश्या कोणत्याही सुविधा पुरविल्या जात नाहीत. तसेच, रेल्वे प्रशासन कोणत्याही प्रकाराने बांधकाम करण्याची परवानगी देत नाहीत. तरी, प्रत्येक पोलीस ठाण्याच्या आवारात पुरुष व महिला विश्रामगृह बांधून मिळणेबाबत वरिष्ठ अधिकारी यांचे मार्फतीने रेल्वे प्रशासनास पत्रव्यवहार होणेबाबत. | **कार्यासन क्र. २७-ब :-** या कार्यालयाच्या क्र.पोमसं/ २७/लोहमार्ग/विश्रा.बांध /२१९/२०१९, दि. ०६/१२/२०१९ च्या ज्ञापान्वये आणि दि. ०२/०१/२०२० च्या स्मरण ज्ञापान्वये अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सदर मुद्दयाच्या अनुषंगाने प्रत्येक पोलीस ठाण्याच्या आवारात पुरुष व महिला यांचेकरिता विश्रामगृह बांधकामाची आवश्यकता असल्यास, त्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव आवश्यक कागदपत्रांसह या कार्यालयास पाठविण्याबाबत कळविण्यात आले आहे. | काही ठिकाणी पोलीस ठाण्याच्या आवारात पुरुष व महिला विश्रामगृह बांधूण्यात आले असून, इतर ठिकाणी बांधण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.<br>**मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला आहे.** |

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन</th><th>उपस्थित केलेले मुद्दे.</th><th>कार्यासनाचे अभिप्राय</th><th>मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश</th></tr>
<tr><td>३२.</td><td>पो.ना./१२१८ आर. एम. बोराडे नेम. शहर वाहतूक शाखा, औरंगाबाद</td><td>R.P.I. व R.S.I. उत्तीर्ण झालेले शसस्त्र पोलीस हवालदार यांचे R.S.I. पदोन्नती भरणेबाबत.</td><td><u>कार्यासन क्र. ३-अ :-</u> पदोन्नती समिती सन २०१९-२०२० ची बैठक झाल्यानंतर सदरची पदे पदोन्नतीने भरण्यात येतील.
<table>
<tr><th colspan="3">दि. ०१/०१/२०२० ची सद्य:स्थिती राखीव पोलीस निरीक्षक</th></tr>
<tr><th>मंजूर</th><th>हजर</th><th>रिक्त</th></tr>
<tr><td>११६</td><td>११४</td><td>०२</td></tr>
</table>
<table>
<tr><th colspan="3">दि. ०१/०१/२०२० ची सद्य:स्थिती राखीव पोलीस उप निरीक्षक</th></tr>
<tr><th>मंजूर</th><th>हजर</th><th>रिक्त</th></tr>
<tr><td>२००</td><td>१६३</td><td>३७</td></tr>
</table></td><td>R.P.I. व R.S.I. उतीर्ण हवालदार यांचे पदोन्नतीबाबत लवकरच कार्यवाही केली जाणार असल्याचे मा.अध्यक्षांनी सांगितले. मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला आहे.</td></tr>
<tr><td>३३.</td><td>पो.ना./१२१८ आर. एम. बोराडे नेम. शहर वाहतूक शाखा, औरंगाबाद</td><td>महाराष्ट्रातील पोलीस आयुक्तालय व पोलीस अधिक्षक यांचे मार्गदर्शनाखाली प्रत्येक जिल्हयात पोलीस पाल्यांसाठी दररोज तसेच, हुशार पोलीस पाल्यांना U.P.S.C. व M.P.S.C. चे क्लासेस आयोजन पोलीस कल्याण अंतर्गत सुरु करणे.</td><td><u>कार्यासन क्र. २८-अ :-</u> पोलीस कल्याण निधी नियमावली मधील नियम ९ मध्ये पोलीस कल्याण निधीचे सदस्य व त्यांच्या कुटूंबियांकरिता योजना / उपक्रम राबविण्याबाबत तसेच व्यावसायिक प्रशिक्षण वर्ग चालविण्याबाबत नमूद केले आहे.<br>तरी घटक प्रमुख यांच्या वित्तीय मर्यादेच्या अधिन राहून असे उपक्रम राबवू शकतात.</td><td>अभिप्रायाच्या अनुषंगाने मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला आहे.</td></tr>
<tr><td>३४.</td><td>पो.शि. गणेश महादेव काकड, नेम. महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक<br><u>( सभासद )</u></td><td>प्रशिक्षण केंद्रात काम करणा-या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना ०६ व्या वेतन आयोगाप्रमाणे मुळ वेतनाचे ३० टक्के भत्ता मिळत आहे. परंतू सध्या ३० टक्के भत्ता ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे मिळत नाही. तरी, सदरचा भत्ता ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे मिळावा.</td><td><u>कार्यासन क्र. ३० :-</u> याबाबत असे नमूद करण्यात येते की, या कार्यालयाचे पत्र क्र. प्रशि/आस्था-२/३०% प्रशिक्षण भत्ता/२६४/२०१९/८३, दि. २७/०६/२०१९ अन्वये ७ व्या वेतन आयोगानुसार पोलीस प्रशिक्षण केंद्रातील मुळ वेतनावर प्रशिक्षण भत्ता देण्याबाबत शासनास प्रस्तावित केले आहे.<br>सदर प्रकरणी शासनाने काही मुद्दे उपस्थित केले आहेत. त्या अनुषंगाने पत्रव्यवहार चालू आहे.</td><td>अभिप्रायाच्या अनुषंगाने मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला आहे.</td></tr>
</table>

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|
| ३५. | दीक्षीत गेडाम, पोलीस अधीक्षक, सिंधुदूर्ग **( सभासद )** | सहाव्या वेतन आयोगामध्ये पोलीस नाईक या पदासाठी दरमहा रु. ४८०/- विशेष वेतन मंजूर होते परंतू, सातव्या वेतन आयोगामध्ये पोलीस नाईक या पदासाठी विशेष वेतन मंजूर करण्यात आलेले नाही. | **कार्यासन क्र. ३० :-** सदरचा मुद्दा हा ५१ व्या पोलीस कर्मचारी वृंद परिषदेमध्ये उपस्थित झ ाालेला अ सून, या कार्यालयाचे पत्र क्र.पोमसं/३०/ कर्मचारी वृंद परिषद/५० वी सभा/२३०/२०१८, दि. १०/०७/२०१९ अन्वये शासनास सादर करण्यात आलेला असून, समक्रमांकित दि. ३०/१०/२०१९ व दि. ०९/१२/२०१९ रोजी शासनास स्मरणपत्रे पाठविण्यात आलेली आहेत. | सदरबाबत शासनाचे वेतन त्रुटी आयोगाकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला असून, लवकरात लवकर कार्यवाही शासनाकडून अपेक्षित आहे असे अपोमसं, प्रशासन,म.रा., मुंबई यांनी कळविले.<br>त्या अनुषंगाने **मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला आहे.** |
| ३६. | पो.ना./१२१८ आर. एम. बोराडे नेम. शहर वाहतूक शाखा, औरंगाबाद | सॅलरी पॅकेज विमा बँक प्रमाणपत्र सर्व पोलीस कर्मचा-यास मिळणेबाबत. | **कार्यासन क्र. ३० :-** या कार्यालयाचे पत्र क्र.पोमसं/३०/ क.वृं. प./५२ वी सभा/४८/१७०/२०१९, दि. ०३/०१/२०२० अन्वये पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर यांना सदर मुद्दयाच्या अनुषंगाने त्यांचे अभिप्राय / सद्य:स्थिती उपलब्ध करुन, देण्याबाबत कळविण्यात आले आहे. अभिप्राय प्राप्त होताच ते कळविण्यात येतील. | मुद्दा स्पष्ट होत नाही तसेच, सभासद स्वत: उपस्थित नसल्यामुळे **मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.** |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|
| ३७. | पो.ह. / १५५८ अनिल उत्तम काळे, नेम. पुणे ग्रामीण | दि. ०५/११/२०१९ ते दि. १२/११/२०१९ पर्यंत कार्तिकवारी पंढरपूर यात्रा बंदोबस्त कामी पंढरपूर येथे कर्तव्यावर असताना सोबत सर्व परिक्षेत्रिय पोलीस अधिकारी / कर्मचारी हे सदरच्या बंदोबस्तात माझ यासोबत होते. त्यावेळी पोलीस कर्मचारी यांच्या अडीअडचणी बाबत चर्चा झाली असता, सदरच्या चर्चेमध्ये पोलीस हे जनतेशी सौजन्याने बोलतात, वागतात परंतू, स्वत:चे शासकीय कामकाजासाठी ते वेळात वेळ काढून कार्यालयास जातात, त्यावेळी कार्यालयातील लिपिक वर्गीय कर्मचारी हे त्यांच्याशी व्यवस्थित बोलणं नसून, कामाची टाळाटाळ करुन वरिष्ठांची भिती घालतात. याबाबत कोल्हापूर परिक्षेत्रिय अधिकारी / कर्मचारी यांच्या बोलण्यातून निदर्शनास आले, तरी, याबाबत त्यांना योग्य ती समज देऊन, त्यांच्या भाषाशैलीत सुधारणा होणेबाबत. | **कार्यासन क्र. ३६ :-** सर्व पोलीस अधिकारी व कर्मचा-यांनी त्यांचे अडचणींचे निवारण होण्यासाठी विहित कार्यपध्दतीनुसार संबंधित पोलीस आयुक्त / सह पोलीस आयुक्त / विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक / पोलीस अधीक्षक यांचेकडे आज्ञांकित कक्ष घेऊन, त्यांच्या अडचणी मांडण्याबाबत आणि ज्या समस्यांचे निराकरण क्षेत्रिय स्तरावर होऊ शकत नसेल, त्याबाबत संबंधित घटक प्रमुखांच्या परवानगीने या कार्यालयातील संबंधित विशेष पोलीस महानिरीक्षक / सहायक पोलीस महानिरीक्षक यांचेकडे आज्ञांकित कक्ष घेऊन, त्यांच्या अडचणी मांडण्याबाबत तसेच, कामकाजाच्या संबंधित लिपिक कर्मचा-यांकडे कार्यासनात जाऊन, चौकशी न करण्याबाबत / वादविवाद करुन, शासकीय कामकाजात व्यत्यय न आणण्याबाबत या कार्यालयाचे क्र.पोमसं/३६/र.व का.(८३००)/ कर्मचारी वृंद परिषद/१०१/२०१९, दि. २०/०२/२०२० अन्वये परिपत्रकीय सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. | मा. पोलीस महासंचालक स्वत: कोल्हापूर दौ-यावर येणार आहेत. त्यावेळेस सदरप्रकरणी संबंधितांशी चर्चा करण्यात येणार आहे. **सदर मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला आहे.** |
| ३८. | श्री. जनार्दन वसंत पाटील, स.पो.नि. नेम. महामार्ग सुरक्षा पथक, म. रा., मुंबई | महाराष्ट्र पोलीस दलात कार्यरत असलेल्या सर्व पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उप निरीक्षक यांची संपूर्ण एकत्रित सेवाज्येष्ठता यादी तयार करण्यात येवून, दरवर्षी यादीत सुधारणा करुन ती प्रसिध्द करण्यात यावी. | **कार्यासन क्र. ६ :-** पोलीस शिपाई ते पोलीस नाईक / पोलीस नाईक ते पोलीस हवालदार / पोलीस हवालदार ते सहायक पोलीस उप निरीक्षक यांना पदोन्नती देण्याबाबतची कार्यवाही ही संबंधीत घटकाकडून होत असल्याने, त्यांची सवाज्येष्ठता यादी संबंधीत घटकांकडे असणे आवश्यक आहे. तथापि, राज्य पोलीस विभागातील सर्व पोलीस हवालदार व सहायक पोलीस उप निरीक्षक यांची सेवाज्येष्ठता यादी तयार करण्यासाठी या कार्यालयाच्या क्र.पोमसं/६/पोह-सपोउनि/ ज्ये.यादी/ २९६/ २०१९, दि. १७/०९/२०१९ अन्वये सर्व पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षक (लोहमार्गासह) यांचेकडून त्यांच्या आस्थापनेवरील सर्व पोलीस हवालदार व सहायक पोलीस उप निरीक्षक यांच्या संपूर्ण सेवातपशिलाची माहिती मागविण्यात आलेली असून, ती संकलीत करण्यात येत आहे. | एकत्रित सेवाज्येष्ठता यादी तयार करण्याची आवश्यकता नसल्यामुळे, **मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|
| ३९. | श्री. जनार्दन वसंत पाटील, स.पो.नि. नेम. महामार्ग सुरक्षा पथक, म. रा., मुंबई | पोलीस नाईक हे पद तात्पुरत्या स्वरुपात श्रेणीवाढ पध्दतीने भरण्यात येऊ नये. सदर पद संख्या पोलीस हवालदार या पद संख्येत कायम स्वरुपी वर्ग करण्यात यावी. | **कार्यासन क्र. ६ :-** राज्य पोलीस विभागातील सर्व पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षक यांच्या आस्थापनेवरील पोलीस कर्मचा-यांच्या पदोन्नतीच्या संबंधीत वाढ करण्याच्या उद्देशाने शासनाने पोलीस नाई या पदाची निर्मिती केली आहे. तसेच, म.शा.वि.वि., शासन अधिसूचना क्र.वेपुर-२०१७/प्र.क्र.१२/सुधारणा-८७/सेवा-९, दि. १९/०५/२०१७ अन्वये ६ वेतन आयोगानुसार पोलीस नाईक या पदाची वेतन श्रेणी ५२०० - २०२०० + २५०० अशी विहित केलेली आहे. सदरचे पद पोलीस हवालदार या पद संख्येत कायमस्वरुपी वर्ग करावयाचे झाल्यास तसा स्वतंत्र प्रस्ताव कार्यासन क्र. २६-ब कडून शासनास सादर करणे आवश्यक आहे. | सदरचा मुददा सयुंक्तिक वाटत नसल्यामुळे, **मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला आहे.** |
| ४०. | श्री. जनार्दन वसंत पाटील, स.पो.नि. नेम. महामार्ग सुरक्षा पथक, म. रा., मुंबई | पोलीस अंमलदार / अधिकारी यांनी केलेल्या अर्जावर अर्जदारास उत्तर देण्यात यावे. | **कार्यासन क्र. ६ :-** सदरचा मुद्दा राज्य स्तरावरील पोलीस कर्मचारी वृंद परिषद-५२ व्या सभेत मान्य झाल्यास सर्व पोलीस घटकांना त्यांच्या आस्थापनेवरील कार्यरत पोलीस अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांच्या अडीअडचणी संबंधात केलेल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती संबंधित अर्जदारास लेखी कळविण्याबाबत निर्देश देण्यात येईल. | प्रस्तुत प्रकरणी कार्यासन क्र. ६ यांनी सर्व पोलीस घटकांना परिपत्रक निर्गमित करावे. **मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|
| ४१. | श्री. जनार्दन वसंत पाटील, स.पो.नि. नेम. महामार्ग सुरक्षा पथक, म. रा., मुंबई | महाराष्ट्र राज्य शासन EXD-१०७६ /१९४५ /१३७-XVII, Dt. ०१/११/१९७७ या निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत. | **कार्यासन क्र. ६ :-** या कार्यासनातून पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उप निरीक्षक या पदावरील पोलीस कर्मचा-यांच्या आस्थापनाविषयक बाबी हाताळल्या जातात. पैकी पोलीस शिपाई यांची सरळसेवा भरतीने तसेच पोलीस शिपाई पदावर नियमित किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या पोलीस शिपाई यांना त्यांच्या सेवाज्येष्ठतेनुसार पोलीस नाईक या पदावर तसेच पोलीस नाईक पदावर सलग किमान ३ वर्षे सेवा झालेल्या पोलीस नाईक यांना पोलीस हवालदार या पदावर सेवाज्येष्ठतेनुसार आणि पोलीस हवालदार या पदावर सलग किमान ३ वर्षे नियमित सेवा झालेल्या पोलीस हवालदार यांना सहायक पोलीस उप निरीक्षक या पदावर पदोन्नती देण्याची सेवा प्रवेश नियमात तरतूद आहे. त्यामुळे सदर पदांपैकी कोणत्याही पदांवरील पदोन्नतीसाठी कोणतीही विभागीय परिक्षा घेण्याची शासन तरतूद नाही. तथापि, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण-२३१८/प्र.क्र.३/का-१७, दि. ०१/०३/२०१८ अन्वये शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना शासन सेवेत कायम करणे, नियमित करणे किंवा पदोन्नती देण्याकरिता घेण्यात येणा-या सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परिक्षा / विभागीय परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट देण्यासंदर्भातील तरतूदीमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. | विशेष पोलीस महानिरीक्षक, आस्थापना यांनी शासनाने २०१८ चे शासन निर्णयात सुधारणा केली असून, त्याप्रमाणे कार्यवाही होत असल्याचे सांगितले. याबाबत विशेष पोलीस महानिरीक्षक, (आस्थापना) यांचेकडून अभिप्राय घेण्यास कळविले. |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|
| ४२. | प्र. अपर पोलीस अधिक्षक, भंडारा | सध्या सुरु असलेल्या महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनेअंतर्गत व रिअंबर्समेंट देयकात पोलीसांना किंवा त्यांचे कुटूंबियांना अचानक उदभवलेल्या रोगावर उपचार होऊन, या योजनेचा लाभ मिळतो. परंतू, पोलीसांना त्यांच्या डयुटीकाळात त्यांच्यावर पडणा-या तणावाचा विपरीत परिणाम होऊन, हळूहळू अनेक प्रकारेच रोग होऊ लागतात. त्याची जाणीव सुध्दा कर्मचा-यांना नसते. ज्यावेळी हळूहळू उद्‌भवणा-या रोगाचा त्रास जास्त होऊ लागतो. ज्यावेळी तो डॉक्टरकडे जाऊन तपासणी करतो. त्यावेळी फार दिवसापासून रोग असल्याचे डॉक्टर सांगतात. अश्या रोगावर निदान करतांना मात्र महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनोचा लाभ व रिअंबर्समेंट देयकाचा लाभ मिळत नाही. उदा. स्पाईन (शरिरातील रक्त वाहिन्या ब्लॉक होणे) डोळयांचा आजार वगैरे या रोगवर महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनेअंतर्गत उपचार केल्या जात नाही. तसेच, रिअंबर्समेंट देयक सुध्दा मंजूर होत नाही. | **कार्यासन क्र. २८ :-** महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना ही शासनाच्या वैद्यकीय प्रतिपुर्तीच्या धर्तीवरच तयार केलेली योजना आहे.<br>शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.एम्एजी २००५/९/ प्र.क्र.१/आ.३, दि. १९/३/२००५ अन्वये २७ आकस्मिक व ५ गंभीर अशा एकूण ३२ आजारांवर आंतररुग्णालयीन औषधोपचार विनामूल्य देण्याची तरतूद विहीत केली आहे. त्याचप्रमाणे याच ३२ आजारांबाबत शासकीय वैद्यकीय प्रतिपुर्ती करण्यात येते.<br>अर्जदार यांनी उपस्थित केलेल्या आजारांचा उपरोक्त ३२ आजारांमध्ये समावेश नाही. तथापि, आदेश झाल्यास अर्जदार यांनी नमुद केलेल्या आजारांचा महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेंतर्गत उपचार विनामुल्य करण्यासाठी गृह विभागास प्रस्ताव सादर करण्यात येईल. | कार्यासन अधिकारी, का. क्र. २८ यांनी वि.पो.म.नि. (प्रशासन) यांचे अध्यक्षतेखाली राज्यातील सर्व पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय) यांची बैठक आयोजित करुन, त्यांना योग्य ते मार्गदर्शन / निर्देश देण्यात यावेत. **मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला आहे.** |
| ४३. | पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), चंद्रपूर | महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजना अंतर्गत पॅनलवर असलेल्या हॉस्पिटलमध्ये ज्यावेळी पोलीस अधिकारी / कर्मचारी उपचाराकरिता दाखल होतात. त्यावेळेस त्यांचे उपचाराकरिता मुंबई वरुन मागविण्यात आलेली मंजूरी जो पर्यंत येत नाही तो पर्यंत पोलीस अधिकारी / कर्मचारी यांचा उपचार हॉस्पिटलमध्ये होत नाही. जर एखादा पेशंट सिरीयस असेल, तर त्यावेळेस पेशंटच्या जिवीतास धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. करिता पॅनलवरील रुग्णालयास उपचारा संबंधाने योग्य निर्देश देण्यात यावे. जेणेकरुन रुग्णास योग्य तो उपचार वेळेवर उपलब्ध होऊन, रुग्णाच्या जिवीतास धोका निर्माण होणार नाही. | **कार्यासन क्र. २८ :-** महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेंतर्गत एखादा रुग्ण हॉस्पीटलमध्ये दाखल झाल्यावर रुग्णाच्या आजारावरील उपचार सदर योजनेंतर्गत देय आहे किंवा नाही, याबाबत त्रयस्थ पक्ष प्रशासक यांच्याकडुन मंजुरी घेणे आवश्यक आहे. तथापि, सदर मंजुरीसाठीची आवश्यकती सर्व कागदपत्रे (सभासद पडताळणी प्रमाणपत्र, कुटुंब मर्यादा प्रमाणपत्र आणि रुग्णाच्या आजाराबाबतची कागदपत्रे इ.) सादर केल्यास मंजुरी लगेच दिली जाते. महत्वाचे ही सर्व प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने अवलंबिली जाते. योग्य कागदपत्रे सादर केल्यास या मंजुरीसाठी नाममात्र कालावधी लागतो. | पोलीस उप अधिक्षक, मुख्यालय चंद्रपूर यांना बोलावून त्यांचेकडून माहिती घेवून, वि.पो.म.नि. (प्रशासन) यांनी योग्य ती कार्यवाही करावी. |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|
| ४३. | | | तसेच, सदरची मंजुरी मिळेपर्यंत रुग्णावर आवश्यकते उपचार सुरु केले जातात. आता, अर्जदार यांनी नमुद केलेली बाब ही मोघम स्वरुपाची असुन त्यांना कोणत्या हॉस्पीटलमध्ये अशाप्रकारची अडचण उद्‌भवली त्या हॉस्पीटलचे नाव या कार्यालयास त्यांच्या घटक प्रमुखांमार्फत लेखी स्वरुपात कळवावे, जेणे करुन संबंधित हॉस्पीटलला त्याबाबत योग्य ती समज देण्यात येईल. | |
| ४४. | म.पो.शि. / १९१ सुलताना पठाण, नेम. पोलीस मुख्यालय, चंद्रपूर | चंद्रपूर जिल्हयात महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनांतर्गत पॅनलवर सध्या दोनच रुग्णालय असून, चंद्रपूर जिल्हयातील बरेच नामांकित रुग्णालय पॅनलवर येण्यास इच्छूक आहेत. महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनेच्या अटी व शर्तीमध्ये NABH प्रमाणपत्र रुग्णालयाकडे असणे आवश्यक आहे. परंतू पॅनलवर येवू ईच्छिणा-या रुग्णालयाकडे NABH प्रमाणपत्र उपलब्ध नसल्याने, रुग्णालयांना पॅनलवर येण्यास अडचण निर्माण होत आहे. चंद्रपूर जिल्हा हा अतिदूर्गम व प्रदुषित वातावरण असलेला जिल्हा म्हणून ओळखला जातो. जिल्हयात पॅनलवर जास्तीत जास्त रुग्णालय असणे आवश्यक असल्याने, NABH प्रमाणपत्राची अट शिथील केल्यास पॅनलवर जास्तीत जास्त रुग्णालयांना समाविष्ठ करणे सोईचे होईल. | **कार्यासन क्र. २८ :-** महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेच्या पॅनलवर सद्यस्थितीत एकुण २२५ हॉस्पीटल असुन त्यापैकी चंद्रपुरमध्ये एकुण ३ हॉस्पीटल पॅनलवर आहेत. त्यांची नावे खालीलप्रमाणे : 1) Dulwar Accident Fracture & Backopain Cline Hospital 2) CHL Hospital 3) Christ Hospital<br>पोलीस अधीक्षक, चंद्रपुर यांच्याकडुन CHRIST हॉस्पीटलचा प्रस्ताव प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झाला. सदर हॉस्पीटलकडे NABH प्रमाणपत्र असल्याने त्यांना म.पो.कु.आ. योजनेच्या पॅनलवर घेण्यात आलेले आहे.<br>NABH प्रमाणपत्र हे हॉस्पीटलमधील रुग्णांच्या उपचारार्थ सोई-सुविधा, सुसज्जता आणि बहुविशेषत: (Multispeciality) या बाबी आहेत किंवा कसे, या तपासुन देण्यात येते. जर हॉस्पीटला NABH प्रमाणपत्राची अट शिथील केली तर, रुग्णांवरील उपचाराच्या योग्य त्या सोई-सुविधा यांचा योग्य दर्जा राहणार नाही. आणि असे हॉस्पीटल पॅनलवर असल्यास पुन्हा तक्रारीस वाव मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी, या मुद्याबाबत पोलीस अधीक्षक, चंद्रपुर यांचे स्वयंस्पष्ट अभिप्राय मागविण्यात येतील. तसेच, महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेच्या पॅनलवर येण्यास इच्छुक असलेले चंद्रपुर जिल्ह्यातील हॉस्पीटलचे प्रस्ताव तपासुन, या कार्यालयास पाठविण्याबाबत कळविण्यात येईल. | ज्या ठिकाणी रुग्णालये उपलब्ध आहेत त्याचेकडून NABH प्रमाणपत्र घेण्यात येते. तर ज्या ठिकाणी रुग्णालये नाहीत त्यावेळेतस संबंधि विपोमनि व पोअ यांचे अभिप्राय घेऊन रुग्णालये पॅनल घेता येतात असे विपोमनि, (प्रशासन) यांनी सांगितले. |

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|
| ४५. | पोलीस निरीक्षक, मानवी संसाधन विकास, चंद्रपूर | महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनेंतर्गत समाविष्ठ असलेल्या आजारामध्ये कावीळ, किडनी स्टोन, डेंग्यू तसेच ( हिप / नी ) रिप्लेसमेंट सर्जरीचा समावेश नसल्याने, उक्त आजारावरील औषधोपचार करण्यास पोलीस अधिकारी / कर्मचारी व त्याचे कुटूंबीयांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. करिता महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनेतर्गत समाविष्ठ असलेल्या आजारामध्ये कावीळ, किडनी स्टोन, डेंग्यू तसेच (हिप / नी) रिप्लेसमेंट सर्जरीचा समावेश करण्यात यावा. | **कार्यासन क्र. २८ :-** महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना ही शासनाच्या वैद्यकीय प्रतिपुर्तीच्या धर्तीवरच तयार केलेली योजना आहे.<br>शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.एम्एजी २००५/९/ प्र.क्र.१/आ.३, दि. १९/३/२००५ अन्वये २७ आकस्मिक व ५ गंभीर अशा एकूण ३२ आजारांवर आंतररुग्णालयीन औषधोपचार विनामूल्य देण्याची तरतूद विहीत केली आहे. त्याचप्रमाणे याच ३२ आजारांबाबत शासकीय वैद्यकीय प्रतिपुर्ती करण्यात येते.<br>अर्जदार यांनी उपस्थित केलेल्या आजारांचा उपरोक्त ३२ आजारांमध्ये समावेश नाही. तथापि, आदेश झाल्यास अर्जदार यांनी नमुद केलेल्या आजारांचा महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेंतर्गत उपचार विनामुल्य करण्यासाठी गृह विभागास प्रस्ताव सादर करण्यात येईल. | कार्यासन अधिकारी यांनी कावीळ व डेंग्यूबाबत शासनास प्रस्ताव सादर करावा.<br>**मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला आहे.** |

# ५२ व्या कर्मचारी वृंद परिषदेच्या बैठकीमध्ये सभासदांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे

| अ. क्र. | मुद्दा सुचकाचे नांव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन | आयत्या वेळी उपस्थित केलेले मुद्दे | मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|
| १ | | परिषदेकरिता जे सभासद उपस्थित असतात त्या सर्वांचे एक ग्रुप फोटो घेण्याबाबत एका सदस्याने मागणी केली. | त्यावर मा.अपोमसं, प्रशासन यांनी पुढील परिषदेचे वेळी कार्यासन अधिकारी, का.क्र.१६ यांनी अशी व्यवस्था करण्याचे आदेश दिले. |
| २ | श्रीमती सानिका उन्मेश गोडांबे,<br>म.पो.शि.क्र.०६-०३११,<br>वाहतुक विभाग, मुंबई | २००६ पासून सुरु केलेली नवीन अंशदान योजनेत सभासदांच्या जमा रक्कमेत तफावती आढळून येत आहेत. | पोलीस आयुक्त, मुंबई यांचेकडील संबंधित पोलीस उप आयुक्त तसेच कार्यासन अधिकारी यांचेकडे अर्ज देऊन / तक्रार सांगून त्यांना Director Accounts Trasary, यांचेकडून अर्जाचे निराकरण करुन घेणेबाबत अपोमसं, प्रशासन यांनी सांगितले. |
| ३ | श्री.सर्जेराव शंकर पाटील,<br>पो.ना.क्र.११७४,<br>सोलापूर शहर | पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांचेकडून माहे मे-२०१९ मध्ये घर बांधणी अग्रिमाकरीता पोमसं कार्यालयाकडे अर्ज पाठविण्यात आलेले आहेत. | मे-२०१९ नंतर जे अर्ज प्राप्त झाले आहेत, त्याकरीता निधी/कर्ज उपलब्ध झालेले नाही. शासनाकडे व्याजाबाबत अडचण निर्माण झाली होती. कर्ज मंजूर झाले न झाल्याने कार्यवाही थांबली होती. त्याबाबत मा.अध्यक्षांनी याबाबत लक्ष देऊन कार्यवाही करत आहोत. |
| ४ | श्री.सर्जेराव शंकर पाटील,<br>पो.ना.क्र.११७४,<br>सोलापूर शहर | MPKY योजनेत मुधमेह आजार समाविष्ट करण्याची मागणी केली. | त्यावर आम्ही चर्चा करुन कार्यवाही करु असे अपोमसं, प्रशासन, म.रा., मुंबई यांनी आश्वासन दिले. |